PREMIUM QUALITY FOOD IN DHULE
* Dosas * Sandwiches * Pav Bhaji * Pulao * Frankie
* Pizza * Fries * Chopsuey / Noodles * Momos
* Soup * Punjabi / Chinese / Continental * Starters
* Sizzler * Tandoor Starters * Chaap * Thali
Main Course * Juices * Falooda / Milkshakes / Dessert
JAIN FOOD AVAILABLE FREE HOME DELIVERY
B'Live ® SPACE FOR KITTY / BIRTHDAY PARTY
Delightful delicacies!
B'Live Restaurant Also available on zomato SWIGGY
Below Card House, Lane No.5, Near Sonya Maruti, Dhule
9423928900 / 9307868768

# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ६९ ■ अंक क्र.३२५ ■ शुक्रवार २८ ऑगस्ट २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

POST REGD.No./DHL/53/24-26

॥ श्री गणेशाय नमः ॥
कुणाल वधवा
9765595037
9405171771
श्रीराम बोरवेल्स
जमीन, घर, शेती यावर
४.७५, ५ व ६ इंची बोर करुन मिळेल.
तसेच सबमर्सिबल पंप बसवून मिळेल.
१४, राधाकृष्णन शॉपींग सेंटर, झाशी राणी चौक, मनपाजवळ, धुळे

## नेपाळ-तिबेट महापुरात १६८ जणांना जलसमाधी
## बेपत्ता अकराशेमध्ये १०५ भारतीयांचा समावेश

**काठमांडू, दि.२७० नेपाळ-तिबेट सीमेवर आलेल्या विनाशकारी महापुराने मोठी हानी केली असून मृतांचा आकडा १६८ वर पोहोचला आहे. यापैकी १६५ जणांचा मृत्यू नेपाळमध्ये, तर तीन जणांचा मृत्यू तिबेटमध्ये झाला आहे. दरम्यान, अकराशेहून अधिक नागरिक अद्याप बेपत्ता असून त्यामध्ये भारतीय नागकिांचाही समावेश आहे. खराब हवामान, भूस्खलन आणि वाहून गेलेले रस्ते यामुळे बचावकार्यात मोठे अडथळे निर्माण होत आहेत. नेपाळमध्ये बेपत्ता असलेल्या परदेशी नागरिकांमध्ये १०५ भारतीय आणि ३७ अनिवासी भारतीयांचा समावेश असल्याची माहिती समोर आली आहे. चीनच्या अधिकृत वृत्तसंस्था सीसीटीव्हीनुसार तिबेटमध्येही ५५० पेक्षा अधिक नागरिक बेपत्ता आहेत.**



नेपाळी सैन्याने रसुवा जिल्ह्यातील तिमुरे भागातून बुधवारी सकाळी ११६ नागरिकांची सुटका केली. यामध्ये ९५ नेपाळी आणि २१ भारतीय नागरिकांचा समावेश आहे. मात्र, अजूनही मोठ्या संख्येने नागरिक ढिगाऱ्याखाली अथवा दुर्गम भागात अडकले असल्याची शक्यता आहे. या आपत्तीमागे अत्यंत शक्तिशाली भूस्खलन कारणीभूत असल्याचे समोर आले आहे. बुधवारी सकाळी आठ वाजून ३७ मिनिटांच्या सुमारास नेपाळ-चीन सीमेजवळ जोरदार कंप जाणवला. सुरुवातीला अमेरिकेच्या भूगर्भीय सर्वेक्षण संस्थेने हा ४.४ तीव्रतेचा भूकंप असल्याचे सांगितले होते. मात्र, नंतरच्या तपासणीत हा प्रत्यक्षात भूकंप नसल्याचे स्पष्ट झाले. पर्वताचा मोठा भाग बर्फ आणि खडकांसह कोसळून ल्हेंडे खोला नदीत पडला. हे भूस्खलन एवढे शक्तिशाली होते की त्यातून ५.२ तीव्रतेच्या भूकंपासारखा कंप निर्माण झाला. या घटनेमुळे मोठ्या प्रमाणात पाणी आणि ढिगारा नदीत मिसळून पुराची लाट निर्माण झाल्याचे सांगण्यात येत आहे. शास्त्रज्ञांच्या मते, हिमनदीचा मोठा भाग पर्वतापासून तुटून खाली कोसळला असण्याची शक्यता आहे. मात्र, या आपत्तीचे नेमके कारण निश्चित करण्यासाठी आणखी काही आठवडे लागू शकतात.

**बिहार,उत्तर प्रदेशात सतर्कता**

नेपाळमधील पुराचा परिणाम भारतातही (पान ४ वर)

## ई-केवायसी ३१ ऑगस्टपर्यंत उशीर केल्यास सिलेंडर महाग

नवी दिल्ली, दि. २७- सरकारी तेल कंपन्यांनी एलपीजी ग्राहकांची ई-केवायसी आणि आधार पडताळणी पूर्ण करण्याची अंतिम मुदत ३१ ऑगस्ट २०२६ पर्यंत वाढवली आहे. यापूर्वी सोळा ऑगस्ट ही अंतिम तारीख होती. त्यानंतर ती २३ ऑगस्टपर्यंत वाढवण्यात आली होती. आता पुन्हा एकदा मुदतवाढ देण्यात आली आहे. ई-केवायसी पूर्ण न करणाऱ्या ग्राहकांना भविष्यात सिलेंडर बुकिंग आणि अनुदानाच्या बाबतीत अडचणी येऊ शकतात. विशेषतः उज्ज्वला योजनेतील ग्राहकांना मिळणाऱ्या अनुदानावरही याचा परिणाम होण्याची शक्यता आहे. हा नियम विद्यमान तसेच नवीन ग्राहकांना लागू असल्याचे सांगण्यात आले आहे. ग्राहकांनी ३१ ऑगस्टपर्यंत ई-केवायसी पूर्ण न केल्यास घरगुती किंवा (पान ४ वर)

### एल.सी.बी. व पोलीस खात्यास गुटखा सापडेना
## सोनगीर जवळ गुटख्याचा कंटेनर पकडला
## अठरा लाखांचा मुद्देमाल जप्त; गुन्हा दाखल

**सोनगीर दि. २७ (प्रतिनिधी) - गुटख्यासंदर्भात कठोर निर्णय विधानसभेत घेणाऱ्या मुख्यमंत्र्यांच्या प्रयत्नांना सरळ हरताळ फासण्याचे काम एलसीबीसह पोलीस खात्यामार्फत सुरु आहे. संपूर्ण जिल्ह्यात गुटख्याची सरेआम विक्री सुरु आहे. संपूर्ण जिल्ह्यात गुटख्याची सरेआम विक्री सुरु आहे. ज्या विभागाकडे केवळ गुन्हे शोधण्याचे काम आहे त्या विभागामार्फत गुटखा पकडला जात नाही का गुटखावाल्यांशी हातमिळवणी करण्यात आली आहे असा सवाल निर्माण झाला आहे. आग्रारोड मोकळा करणाऱ्या ट्रॅफिकचे पीआय वारे यांच्या तडाखेबाज कामात बदल कशामुळे झाला याबद्दल आता जनतेमध्ये चर्चा सुरु झाली आहे.**

महाराष्ट्र शासनाने राज्यभरात बंदी घातलेल्या गुटखा, पानमसाला आणि सुगंधी तंबाखूच्या अवैध वाहतुकीविरोधात अन्न व औषध प्रशासन आणि पोलिसांनी धडक कारवाई केली आहे. सोनगीर पोलीस स्टेशनच्या हद्दीत एका कंटेनरची पाहणी केली असता, तब्बल ३.२१ लाख रुपयांचा प्रतिबंधित अन्नपदार्थांचा साठा आणि १५ लाख रुपयांचा कंटेनर, असा एकूण १८,२१,४४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून वाहन चालकास अटक करण्यात आले आहे.

धुळे जिल्ह्यात गेल्या दीड वर्षापासून गुटख्याचा धंदा करणाऱ्यांना पोलीस खात्याकडून अभय मिळते आहे का? असा सवाल निर्माण झाला आहे. राजरोस गुटखा विक्री सुरु आहे. ज्या एलसीबी विभागाकडून निव्वळ गुन्ह्यांची उकल करण्याची जबाबदारी आहे त्यांना कुठेही मोठा गुटख्याचा साठा शोधण्यात यश आलेले नाही. दीड वर्षाआगोदर दिवसाआड गुटख्याचा साठा पकडला जात होता. आता कुठे माशी शिंकली?

मिळालेल्या माहितीनुसार, २६ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी सुमारे १:०० वाजेच्या सुमारास सोनगीर पोलीस ठाण्याचे अधिकारी, अन्न सुरक्षा अधिकारी (पान ४ वर)

## नंदुरबारला गांजा, दारूविरोधात कारवाई
## तब्बल अडीच लाखांचा मुद्देमाल जप्त

**नंदुरबार, दि.२७ (प्रतिनिधी)- नंदुरबार शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कंजरवाडा परिसरात गांजा व अवैध दारूची विक्री होत असल्याच्या गोपनीय माहितीवरून पोलिसांनी कारवाई करत २ लाख ५९ हजार ९०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला.**

२६ ऑगस्ट २०२६ रोजी पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांना कंजरवाडा परिसरात गांजा व अवैध दारूची विक्री होत असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलीस उपनिरीक्षक भुनेश मराठे यांच्या पथकाने परिसरात सापळा रचून कारवाई केली. पोलिसांनी संशयित ईश्वर शिवधन गुमाने (वय ३६, रा. कंजरवाडा, नंदुरबार) यांच्या राहत्या घराची कायदेशीर झडती घेतली. झडतीदरम्यान ५ किलो सुका गांजा, ८२ लिटर गावठी हातभट्टीची दारू आणि बिअरच्या बाटल्या, असा एकूण २,५९,९०० रुपये किमतीचा मुद्देमाल मिळून आला. पोलिसांनी तो जप्त केला.

ही कारवाई पोलीस उपनिरीक्षक भुनेश मराठे यांच्या नेतृत्वाखाली पोहेकॉ जगदीश पाटील, प्रशांत पाटील, नरेंद्र चौधरी, जितेंद्र तोरवणे, राजेंद्र धनगर, गणेश नाईक तसेच पोलीस शिपाई ललित गवळी, रूपेश पगारे, राहुल राठोड, अमित भरवाड, राजेंद्र काटके, नरेंद्र पाडवी, आनंदा मराठे आणि महिला पोलीस शिपाई निंबाबाई वाघमोडे यांच्या पथकाने केली.या प्रकरणी नंदुरबार शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक विनोदकुमार गोसावी करीत आहेत.

नंदुरबार जिल्ह्यात गांजा, अंमली पदार्थ, गावठी हातभट्टीची दारू, अवैध मद्यविक्री अथवा इतर कोणतेही बेकायदेशीर धंदे सुरू असल्याची माहिती असल्यास नागरिकांनी न घाबरता तत्काळ संबंधित पोलीस ठाण्याला माहिती द्यावी. माहिती देणाऱ्या नागरिकांची ओळख पूर्णपणे गोपनीय ठेवण्यात येईल, असे पोलिसांनी आवाहन केले आहे.



## जिल्ह्यातील अवैध धंदे बंद करण्यासाठी
## युवासेनेतर्फे अ‍ॅड.पंकज गोरेंचे आंदोलन

**धुळे, दि.२७- शहरासह जिल्ह्यातील कथित अवैध धंदे, वाढती गुन्हेगारी आणि कष्टकरी टपरी व रोडगाडीधारकांवरील कारवाईच्या मुद्द्यावरून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने आजपासून आंदोलनाला सुरुवात झाली आहे. युवासेनेचे राज्य सहसचिव अ‍ॅड. पंकज गोरे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात येत असून, प्रशासनाने अवैध धंद्यांविरोधात ठोस कारवाई करावी, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली आहे.**

सट्टा-मटका, जुगार, अवैध दारू विक्री, गांजा, (पान ४ वर)

## अमळनेर तालुक्यात सात जणांचा दुर्दैवी मृत्यू
## चार जण रेल्वेखाली, बाप-लेकाचा बुडून अंत



**अमळनेर दि.२७- तालुक्यात घडलेल्या वेगवेगळ्या दुर्दैवी दुर्घटनांमुळे संपूर्ण परिसर सुन्न झाला असून गुरुवारचा दिवस अमळनेरकरांसाठी प्रचंड घातवार ठरला आहे. टाकरखेडा येथील एकाच कुटुंबातील चार जणांसह चोपडा तालुक्यातील एका युवकाने रेल्वेखाली जीवनयात्रा संपवली, तर खवशी येथे बाप-लेकाचा तलावात बुडून मृत्यू झाला. या सात मृत्यूंमुळे अमळनेर तालुक्यावर शोककळा पसरली आहे.**

टाकरखेडा येथील सुनील अमृत भिल आणि त्यांची पतकी पार्वती सुनील भिल यांनी गुरुवारी भल्या पहाटे सुमारे ४ वाजेच्या सुमारास आपल्या दोन लहान मुलांसहदुसरीत शिकणारा सनी व अंगणवाडीत जाणारा राजघर सोडले. त्यांनी धावत्या रेल्वेसमोर स्वतःला झोकून दिले. या भीषण अपघातात चौघांचेही शरीराचे तुकडे होऊन जागीच मृत्यू झाला. पहाटे ४:४० वाजेच्या सुमारास रेल्वे प्रशासनाने या घटनेची माहिती पोलिसांना दिली. माहिती मिळताच पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम यांच्या मार्गदर्शनाखाली एपीआय गणेश अहिरे, हेडकॉन्स्टेबल संदेश पाटील, विजय भोई, योगेश बागुल आणि राहुल पाटील यांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. कौटुंबिक वादातून हे टोकाचे पाऊल उचलले गेल्याची प्राथमिक चर्चा असून टाकरखेडा गावावर या (पान ४ वर)

## वन्यजीव संरक्षणासह गुन्हेगारीबाबत व्याघ्र कक्ष
## समितीच्या बैठकीत चर्चा; पो.अधिक्षकांचे मार्गदर्शन

**धुळे, दि.२७- जिल्हयातील वन्यजीव संरक्षण व गुन्हेगारी रोखण्याबाबत महत्त्वपुर्ण विषयांवर व्याघ्र कक्ष समितीच्या मासिक बैठकीत चर्चा व निर्णय झाला. पोलीस अधीक्षक कार्यालय, धुळे यांचे दालनात अधीक्षक विशाल आनंद यांच्या अध्यक्षतेखाली समितीची आज बैठक झाली.**



उप वनसंरक्षक एम.बी. नाईकवाडी, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर वारे, निसर्गमित्र राज पाटील, तेजस पोतदार, वीज वितरण कंपनीचे उप कार्यकारी अभियंता सौरभ शर्मा, हवालदार चेतन बोरसे, विनायक सुर्यवंशी, पोलीस विभाग, वन विभाग, संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

वाघ व वन्यजीवांच्या संरक्षणासाठी अधिक प्रभावी उपाय योजना आखणे, अवैध शिकारीला आळा घालणे, वन्यजीवांच्या अवयवांच्या चोरटया व्यापारावर प्रतिबंध, मानव वन्यजीव संघर्ष रोखणे या उद्देशाने बैठक झाली. त्याचबरोबर संयुक्त गस्त व नाकाबंदी दरम्यान वनक्षेत्र व संशयास्पद मार्गावर पोलीस व वन विभागाची संयुक्त गस्त, नाकाबंदी आणि वाहन तपासणीचे नियोजन करणे. वन विभागातील क्षेत्रिय अधिकारी, कर्मचाऱ्यांना पोलीस दलातर्फे शस्त्र प्रशिक्षण देणे, वनक्षेत्रातील अतिक्रमण निर्मूलन करणे. वन्यप्राण्यांचा (पान ४ वर)

## मिल परिसरातील महिलेची आत्महत्या

धुळे, दि.२७- येथील मिल परिसर साने गुरूजी कॉलनीतील विवाहितेने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना आज घडली. रोहिणी अजयकुमार पवार (वय ३५) असे तिचे नाव आहे. सकाळी मुलीसोबत बाहेर फिरण्यासाठी गेल्या होत्या. तेथून परतल्यानंतर त्या पुन्हा झोपी गेल्या. सकाळी साडेआठच्या सुमारास मुलगी उठल्यानंतर तिने स्वयंपाक खोलीत जावून पाहिले असता आई रोहिणीने छताच्या अँगलला ओढणीच्या गळफास घेतलेल्या अवस्थेत दिसली. मुलीने आरडाओरड केली असता परिसरातील नागरिकांनी धाव घेतली. रोहिणी पवार यांना खाली उतरवून श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात दाखल केले. डॉक्टरांनी मृत घोषित केले.

## एमपीएससीची औषध निरीक्षक परिक्षा पेपरफूट
## लव्ह अँड हेट स्टोरीतून उघड झाल्याचे स्पष्ट

**नंदुरबार, दि.२७ (प्रतिनिधी)- महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या औषध निरीक्षक (गट-ब) पदासाठी २२ मार्च २०२६ रोजी झालेल्या चाळणी परीक्षेच्या प्रश्नपत्रिका फुटीच्या प्रकरणाने खळबळ उडाली आहे. या प्रकरणात मुंबई गुन्हे शाखेने आयोगातील तीन अधिकाऱ्यांसह सहा जणांना अटक केली त्यापैकी कौटिल्य अकादमीचे संचालक प्रवीण दिलीप पाटील, राज्य आदर्श शिक्षक पुरस्कारप्राप्त मुख्याध्यापक अमृत नामदेव पाटील आणि लोकेश ऊर्फ गौरव राजेंद्र पाटील हे तिघे नंदुरबार जिल्ह्यातील आहेत. त्यामुळे पेपर फुटीचे केंद्रबिंदू हे नंदुरबार ठरले आह. आधीच ऑडिओ क्लिप प्रकरणाने गाजलेले नंदुरबार पेपर फुटी प्रकरणाने बदनामीच्या भोवऱ्यात अडकले आहे.**

या प्रकरणाचा धक्कादायक उलगडा कथित लव्ह स्टोरीमधून झाल्याचे समोर आले आहे. परीक्षेच्या दोन दिवस आधी प्रेयसीला प्रश्नपत्रिका मिळवून दिल्यानंतर दोघांमध्ये ब्रेकअप झाले. संबंधित तरुणी परीक्षेत उत्तीर्ण होऊन सातव्या क्रमांकावर आली. ती आता अधिकारी होऊन आपल्यापेक्षा पुढे जाईल, या रागातून प्रियकराने एमपीएससीकडे तक्रार केल्याची माहिती तपासातून समोर आली आहे.अन्न व औषध प्रशासनातील औषध निरीक्षक पदाच्या परीक्षेसाठी तज्ज्ञांकडून तयार करण्यात आलेल्या प्रश्नसंचातील प्रश्न मिळवून स्वतंत्र प्रश्नसंच तयार करण्यात आल्याचा संशय आहे. हा प्रश्नसंच काही व्यक्तींना उपलब्ध करून देण्यात आल्याचे तपासात निष्पन्न झाल्याचे सांगण्यात येते. याप्रकरणी गुन्हे शाखेने २५ऑगस्ट रोजी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला.प्रवीण दिलीप पाटील हे मूळचे नंदुरबार तालुक्यातील खोंडामळी येथील रहिवासी असून, गेल्या सुमारे दहा वर्षांपासून नंदुरबार शहरात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शनाचे वर्ग चालवितात. त्यांच्या मार्गदर्शनातून ५५० हून अधिक युवकांनी शासकीय व निमशासकीय सेवेत वर्ग २ ते वर्ग ४ पदांवर नोकरी मिळवल्याचे सांगण्यात येते.

अमृत नामदेव पाटील हे जिल्हा परिषद शिक्षक असून, शहादा तालुक्यातील परिवर्धा येथील जिल्हा परिषद शाळेत मुख्याध्यापक म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या शैक्षणिक कार्याची दखल घेत त्यांना राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाला आहे. ते मूळचे शिंदखेडा तालुक्यातील हातनूर येथील रहिवासी आहेत. लोकेश ऊर्फ गौरव राजेंद्र पाटील हा मूळचा नंदुरबार तालुक्यातील शनिमांडळ येथील रहिवासी असून त्यानेच एमपीएससीला ई-मेलद्वारे प्रश्नपत्रिका (पान ४ वर)

## देवरे इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये
## स्टार्टअप संकल्पना स्पर्धा



**धुळे, दि.२७- श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्थेच्या बापूसाहेब शिवाजी राव देवरे अभियांत्रिकी महाविद्यालयात आंतरमहाविद्यालयीन स्टार्टअप संकल्पना सादरीकरण स्पर्धा लँचस्पायर २.० चे नुकतेच आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी मुख्य अतिथी म्हणून उद्योजक व टी.व्ही.वरील शार्क टँक मालिकेतील इनोव्हेटर कमलेश गुमरे (जुगाडू कमलेश) उपस्थित होते.**

महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.डॉ. हितेंद्र पाटील, मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभाग प्रमुख प्रा.डॉ. एस.डी. सूर्यवंशी, महाविद्यालयाच्या इडीपी सेल चे समन्वयक प्रा शिवनाथ सिंग व्यासपीठावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाच्या ईडीपी सेल द्वारे करण्यात आले होते. या स्पर्धे चे परीक्षक म्हणून प्रा.डॉ.डी.सी. सोनवणे, प्रा.डॉ.व्ही.आर. देशमुख, प्रा. एस.आर.सिंग यांनी काम पाहिले. विद्यार्थी समन्वयक साहिल साळुंखे, केदार जोशी हे होत, सूत्रसंचालन राजनंदनी नगराळे या विद्यार्थीनी ने केले. महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा डॉ हितेंद्र पाटील यांनी प्रमुख अतिथी कमलेश गुमरे यांचा पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार केला. त्यांनी विद्यार्थ्यांना नोकरी च्या मागे न लागता स्टार्टअप संकल्पना प्रत्यक्षात आणून उद्योजक बनण्याचे आवाहन केले. प्रमुख अतिथी कमलेश गुमरे यांनी त्यांचा उद्योजकतेचा प्रवास कथन केला व स्टार्टअप च्या माध्यमातून उद्योजक बनण्यास वाव असून या संधीचा लाभ घेण्याचे आवाहन केले.

दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -1,45,400 रु.+3% GST
सोने- 24 K -1,58,000 रु.+3% GST
चांदी- 2,44,000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

## ना.आठवले ३० ऑ.ला जळगाव जिल्हा दौऱ्यावर

शहादा,दि.२७(का.प्र.)- केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री तथा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) चे राष्ट्रीय अध्यक्ष खा. रामदास आठवले हे रविवार ३०ऑगस्ट रोजी जळगाव जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. या पार्श्वभूमीवर रिपब्लिकन पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण असून भुसावळ येथील कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन नंदुरबार जिल्हाध्यक्ष अनिल कुवर यांनी केले आहे. खा. आठवले हे ३०ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता अजिंठा शासकीय विश्रामगृह, जळगाव येथे दाखल होऊन पदाधिकाऱ्यांशी संवाद साधतील. त्यानंतर मुक्ताईनगर येथे आमदार एकनाथराव खडसे यांच्या अमृत महोत्सवी कार्यक्रमास उपस्थित राहतील. या दौऱ्यात पक्षाच्या संघटनात्मक बांधणीबाबत व आगामी वाटचालीबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे.पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाच्या आदेशानुसार आणि नूतन जिल्हाध्यक्ष अनिल कुवर यांच्या नेतृत्वाखाली नंदुरबार, शहादा, तळोदा, नवापूर, अक्कलकुवा व धडगाव तालुक्यातील सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी अंतर्गत मतभेद विसरून या दौऱ्याला उपस्थित राहावे असे सूचित करण्यात आले आहे.या कार्यक्रमास रिपाईचे राष्ट्रीय उपाध्यक्ष काकासाहेब खंबाळकर, उत्तर महाराष्ट्र प्रभारी रमेश मकासरे, लक्ष्मण जाधव, रामभाऊ माणिक, वाल्मिक अण्णा दामोदर, प्रभाकर जाधव, कार्याध्यक्ष शशिकांत वाघ, उपाध्यक्ष संजय पाटोळे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

## गणेशोत्सवाच्या परवानग्या आता
## महापालिकेच्या संकेतस्थळावर

**धुळे, दि.२७- आगामी गणेशोत्सव २०२६ च्या पार्श्वभूमीवर गणेश मंडळांना विविध परवानग्या मिळविण्याची प्रक्रिया अधिक सुलभ, पारदर्शक आणि गतिमान करण्यासाठी धुळे महानगरपालिकेने सर्व परवानग्या ऑनलाईन उपलब्ध करून दिल्या आहेत. महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर गणेशोत्सव २०२६ या टॅबवर क्लिक केल्यानंतर नागरिकांना या सुविधांचा लाभ घेता येणार आहे.**

या ऑनलाईन प्रणालीद्वारे गणेश मंडप परवानगी, मूर्ती व सजावट साहित्य विक्री स्टॉल परवानगी तसेच स्वागत कक्ष परवानगी घेता येणार आहे. विशेष म्हणजे गणेश मंडळांना मंडप परवानगीसाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. मूर्ती व सजावट साहित्य विक्री स्टॉल तसेच स्वागत कक्षासाठी रु. १.४० प्रति चौरस फूट प्रति दिन शुल्क आकारले जाणार आहे. ऑनलाईन अर्ज सादर करताना अर्जदाराचे नाव, मोबाईल क्रमांक, आधार क्रमांक, मंडळाचे नाव व नोंदणी क्रमांक तसेच मंडळाचे अध्यक्ष/सचिव यांचे नाव, मोबाईल क्रमांक व आधार क्रमांक, मंडप/स्टॉल/स्वागत कक्षाच्या (पान ४ वर)

## सर्वांच्या सहभागातूनच विकासाला खरी गती मिळणार : मंत्री रावल

**धुळे, दि.२७- विकास ही एका व्यक्तीची किंवा एका घटकाची बाब नसते. गावातील प्रत्येक घटकाला सोबत घेऊन, सर्वांच्या सहभागातून आणि सहकार्यानेच विकासाला खरी गती मिळते, असे प्रतिपादन राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार रावल यांनी केले.**

ते आज शिंदखेडा तालुक्यातील निरगुडी येथे ग्रामपंचायतीच्या वतीने आयोजित सार्वजनिक वाचनालयाच्या भूमिपूजन समारंभात बोलत होते. यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती नारायण पाटील, संरपंच मीराबाई गिरासे, जिल्हा परिषदचे माजी सदस्य ते पी.आर. पाटील,पंचायत समितीचे शिंदखेड्याचे उपनगराध्यक्ष हे उदयजी देसले, गटनेते चेतन पवार, पाणीपुरवठाचे सभापती दादा मराठे, युवा नेते सत्यजित



सिसोदे, सुखवद चे सरपंच मधुभाऊ पाटील, तावखेड्याची सरपंच विजय पाटील, विरदेल चे सरपंच सतीशजी भेरे, दत्तानेचे उपसरपंच राहुल बोरसे, गव्हाण्याचे उपसरपंच बटू बोरसे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक संजयजी खाकरे, आकडसेचे सरपंच श्री देवीदास कोळी तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, ज्येष्ठ नागरिक, ग्रामस्थ तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

पालकमंत्री श्री. रावल म्हणाले, शासनाच्या माध्यमातून गल्लीपासून गावापर्यंत, गावापासून तालुक्यापर्यंत, (पान ४ वर)

## भूपेशभाई पटेल यांच्या वाढदिवसानिमित्त ॲम्बिशन क्रिकेट स्पर्धा

**शिरपूर, दि.२७- शिरपूर वरवाडे नगर परिषदेचे गटनेते, माजी नगराध्यक्ष, आर. सी. पटेल एज्युकेशनल ट्रस्ट अध्यक्ष भूपेशभाई पटेल यांच्या वाढदिवसानिमित्त शिरपूर एज्युकेशन सोसायटीच्या क्रीडा विभागाद्वारे दि. ते ऑगस्ट या कालावधीत संस्थास्तरीय म्बिशन क्रिकेट स्पर्धांचे आयोजन आर. सी.पटेल फार्मसी कॉलेज शिरपूर येथील मैदानावर करण्यात आले होते.**

शिरपूर एज्युकेशन सोसायटी सचिव सौ. रेषा पटेल, सीईओ डॉ. उमेश शर्मा, स्पोर्टस चेअरमन प्रितेश पटेल, स्पोर्ट्स डायरेक्टर किरण अंचन यांच्या मार्गदर्शनाखाली या स्पर्धा घेण्यात आल्या. सदर स्पर्धेत संस्थेतील विविध माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील विविध वयोगटातील एकूण खेळाडूंनी सहभाग नोंदविला. यात संस्थेतील एकूण मुलांनी सहभाग नोंदविला. मुलांच्या स्पर्धेत वर्षे आतील गटात एकूण संघांनी, तसेच वर्षे आतील गटात संघांनी व वर्षातील गटात संघांनी सहभाग नोंदविला. यात वर्षे आतील प्रथम क्रमांक मुकेश आर. पटेल इंग्लिश मिडीयम सेकंडरी स्कूल शिरपूर, द्वितीय क्रमांक आर. सी. पटेल माध्यमिक विद्यालय भामपूर यांनी मिळवला. वर्षे आतील मुलांच्या संघात प्रथम क्रमांक मुकेश आर. पटेल सीबीएसई स्कूल तांडे व द्वितीय क्रमांक अमरिशभाई आर. पटेल सीबीएसई स्कूल शिरपूर या शाळेने मिळवला. वर्षे आतील मुलांच्या संघात प्रथम क्रमांक मुकेश आर. पटेल मिलिटरी ज्युनिअर कॉलेज, तांडे व द्वितीय क्रमांक आर. सी.पटेल पटेल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय शिरपूर या संघाने पटकावला.

मुलींच्या स्पर्धेत संस्थेतील विविध माध्यमिक शाळांमधील एकूण मुलींनी सहभाग नोंदविला. यात वर्षे आतील एकूण संघांनी व वर्षे आतील संघांनी सहभाग नोंदविला तर वर्षे आतील एकूण संघांनी सहभाग नोंदवला. त्यात वर्षे आतील प्रथम क्रमांक अमरिशभाई आर. पटेल सीबीएसई स्कूल शिरपूर व द्वितीय क्रमांक मुकेश आर.पटेल इंग्लिश मिडीयम सेकंडरी स्कूल शिरपूर या संघाने मिळवला. वर्षे आतील मुलींच्या संघात मुकेश आर.पटेल इंग्लिश मीडियम सेकंडरी स्कूल शिरपूर व द्वितीय क्रमांक अमरिशभाई आर. पटेल सीबीएसई स्कूल शिरपूर या संघाने मिळवला. १९ वर्षे आतील वयोगटात प्रथम क्रमांक आर. सी. पटेल आश्रम ज्युनिअर कॉलेज निमझरी या संघाने मिळविला, द्वितीय क्रमांक आर. सी.पटेल इंग्लिश मीडियम ज्युनियर कॉलेज शिरपूर यांनी प्राप्त केला. या स्पर्धांचे उद्घाटन (पान ४ वर)

# आपला महाराष्ट्र

## डॉ.यास्मिन शेख:मराठीला समर्पित यहुदी विदुषी

अनेक लोक असे असतात की, ते आपल्या आयुष्यात समाजाला उपयोगी होईल असे बरेच काही करून जात असतात. मात्र त्यांच्या कर्तुत्वाची दखल फारशी घेतली जात नाही. जी घेतली जाते ती ज्या क्षेत्रात त्यांनी कामगिरी केली त्या क्षेत्रापुरती मर्यादित असते. हा एक प्रकारे त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर आणि त्यांच्या कर्तृत्वावर झालेला अन्यायच म्हणावा लागेल. आपल्याकडे मानसिकता अशी आहे की, बहुसंख्याक वाद आपल्या डोक्यात खोलवर रुजलेला असतो. त्या चष्म्यातूनच आपण इतिहासकार असो, साहित्यिक असो, कलावंत असो, की वैज्ञानिक असो यांच्याकडे बघत असतो. मोहम्मद रफी यांच्या सारखा पार्श्वगायक यापूर्वी कधी झाला नाही आणि होण्याची शक्यता नाही. झाले बहु होतील बहु परंतु यासम हाच असेच त्यांचे कर्तुत्व आणि ख्याती होती. मात्र त्यांचा धर्म आडवा येतो. जरी त्यांनी गायलेली गाणी दिवसभर आपण ऐकत असू, त्यांना दाद देत असू तरी मनापासून त्यांचे कौतुक होत नाही ही वस्तुस्थिती आहे. बहुसंख्यांक कलावंतांना मात्र हा समाज डोक्यावर घेतो. अलीकडच्या काही वर्षांपासून ही मानसिकता देशात रूजते आहे आणि ती देशहिताच्या दृष्टीने घातक आहे. ही सर्व पार्श्वभूमी नमूद करण्याचे कारण असे की, १०१ वर्ष वयाच्या डॉक्टर यास्मिन शेख यांचे निधन नुकतेच झाले. इंग्रजी शिकणाऱ्यांना, त्या भाषेवर प्रेम करणाऱ्यांना, आणि मराठी घरात आहे म्हणून आवडते अशी भूमिका असणाऱ्यांना डॉक्टर यास्मिन शेख माहित नाहीत. पत्रकारितेच्या आणि मराठी व्याकरणावर प्रेम करणाऱ्या मोजक्या लोकांना सोडले तर त्याही क्षेत्रातील मान्यवरांना यास्मिन शेख माहिती असतील की नाही माहिती नाही.

आताच्या पिढीला गांधी नेहरू माहिती नाहीत. माहिती करून घेण्याची त्यांची इच्छा नाही. तरीही त्या पिढीचे चौफेर कौतुक होत आहे. हा चमत्कार फक्त याच देशात घडू शकतो. पण बरेच तरुण असे आहेत की ते गांधी नेहरूंना वल्लभभाई पटेल यांना सुभाषचंद्र बोस यांना, भगतसिंग यांना, मौलाना आजाद यांना, सरहद्द गांधींना समजून घेण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्याबद्दल त्यांचे आभारच मानले पाहिजेत. डॉक्टर यास्मिन शेख यांच्या संदर्भात देखील असेच म्हणता येईल. काही लोकांनी त्यांना जाणून घेण्याचा प्रयत्न नक्कीच केला.अलीकडे मराठी माणूस परकीय भाषांचा वापर करून ते शब्द मराठीत रूढ करीत आहेत. त्यामुळे मराठी भाषा शुद्धीकरणाच्या दृष्टीने अडचणीत सापडली आहे. जरी साहित्य संमेलनात आणि इतर वेळी होणाऱ्या विविध चर्चासत्रात शुद्ध मराठीचा आग्रह होत असला किंवा तिच्याविषयी काळजी निर्माण होत असली तरी ती समृद्ध व्हावी यासाठी फारसे काही प्रयत्न होत नाहीत. अशा काळात डॉक्टर यास्मिन शेख यांच्यासारख्या विद्वानांची आवश्यकता भासते आणि आठवण येते. त्या दृष्टीने डॉक्टर शेख यांचे जाणे मराठी भाषेची हानी करणारे ठरते. परकीय शब्दांचा वापर करताना आपणच आपली भाषा अशुद्ध बनवतो आहोत त्याचे भान ठेवले गेले पाहिजे असा आग्रह यास्मिन शेख करीत असत. त्यांची ही भूमिका रोखठोक होती. त्या जन्माने ज्यू होत्या. त्यांचा विवाह मुस्लिम व्यक्तीशी झाला होता. परंतु त्या मराठीतील व्याकरण तज्ज्ञ होत्या हे त्यांचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल. अपवादानेच अशा व्यक्ती सापडतात. त्यात यास्मिन शेख यांचा समावेश होता.

शालेय आणि महाविद्यालयीन स्तरावर त्यांनी सुमारे ३४ वर्षे अध्यापन केले. मराठीच्या प्राध्यापक म्हणून त्यांची दीर्घकाळ सेवा नोंदविली गेलेली आहे. अशा व्यक्तीने अतिशय प्रांजल पणे मराठीची सेवा केली हे विशेष म्हणावे लागेल. मराठी भाषेतील शुद्धता असेल, त्यातील सौंदर्य असेल, आणि व्याकरणीक दृष्ट्या ती प्रमाण असेल यासाठी आयुष्यभर त्यांनी व्रत म्हणून काम केलेले आहे. माझी मातृभाषा मराठी आहे आणि मला त्याचा खूप अभिमान आहे अशा त्या वेळोवेळी सांगत असत. भाषेची ताकद जर टिकवायची असेल तर त्यासाठी व्याकरणाची आवश्यकता असतेच. त्याशिवाय मराठीचे सौंदर्य खुलत नाही असे यास्मिन शेख यांनी सिद्ध करून दाखविले. त्यांचा आग्रह इतर कोणीही मोडून काढू शकले नाही कारण तो शुद्धतेचा आग्रह होता. आज खाजगी रेडिओ चॅनल किंवा खाजगी टीव्ही चे चैनल जेवढे आहेत तेवढ्यांनी मराठी भाषेचा पार खुर्दा करून ठेवलेला आहे. जनमानसात त्यामुळे तीच भाषा वापरली जाते. अनेक शब्द इंग्रजीत असतात. अनेक शब्द हिंदीतून असतात. अनेक शब्द संस्कृत मधले असतात. तसेच बोली भाषेतील शब्द देखील मोठ्या प्रमाणावर वापरले जातात त्यामुळे मराठीचे मूळ रूप हळूहळू नष्ट होत आहे. प्रमाणभाषा भलेही जनमानसात वापरली जात नसेल मात्र तिचा आग्रह साहित्यात किंवा प्रसार माध्यमातून नाकारणे चुकीचे आहे. त्या दृष्टीने यास्मिन शेख यांचे व्याकरणिक मराठीसाठी झालेले योगदान महत्त्वाचे आहे. पूर्वाश्रमीच्या त्या जेरुशा रुबेन होत्या. विवाहा नंतर यास्मिन शेख झाल्या. प्रसिद्ध नाटककार वसंत कानेटकर यांच्या पुढाकाराने त्यांचा नाशिक मध्ये एका थेटर मध्ये काम करणाऱ्या अजीज अहमद इब्राहिम शेख यांच्याशी विवाह झाला होता. साहित्यिक प्रा.श्री.म.माटे यांच्यासारख्यांचे त्यांना मार्गदर्शन लाभले. एखाद्या व्यक्तीने मराठीच्या व्याकरण या विषयासाठी आपले संपूर्ण जीवन वाहून घेणे ही फार मोठी गोष्ट आहे. भाषा हा सर्वश्रेष्ठ सांस्कृतिक वारसा असून तो जपण्यासाठी आणि समृद्ध करण्यासाठी फारच कमी लोक झटतात त्यांच्या यादीत प्रथम क्रमांकावर यास्मिन शेख यांचे नाव घ्यावे लागेल. तेवढे मोठे त्यांचे काम आहे.

आजही व्याकरणाच्या दृष्टीने अनेकांचा मराठीत लेखन करताना खोळंबा होतो. चुकीच्या व्याकरणाचा वापर होतो. अशांसाठी मराठी लेखन मार्गदर्शिका, मराठी शब्द लेखन कोश, आणि सुगम मराठी व्याकरण कोश हे त्यांचे ग्रंथ खूपच मार्गदर्शक ठरले. या कामगिरीबद्दल त्यांना अनेक पुरस्कार मिळाले. राज्य शासनाचा मराठी भाषा विभागाचा पुरस्कार, महाराष्ट्र साहित्य परिषदेचा पुरस्कार, जीवन गौरव पुरस्कार, अंतर्नाद या मासिकाच्या वतीने पुरस्कार अशा काही पुरस्कारांचा त्यात समावेश आहे. त्या १०१ वर्षांच्या होऊन त्यांनी जगाचा निरोप घेतला. याचा अर्थ त्या परिपूर्ण जगल्या. मराठी शब्द लेखन हा सुमारे १९ हजार शब्दांचा संग्रह त्यांच्या लेखन संशोधनातून सिद्ध झालेला आहे. एवढे मोठे भांडार त्यांनी शुद्ध मराठीसाठी उपलब्ध करून दिलेले आहे. त्याचा वापर किती आणि कोण करणार हा जरी प्रश्न असला तरी ज्यांना शुद्ध मराठीची जाण आहे किंवा त्याच्या मनात तसा आग्रह आहे त्याच्यासाठी या १९ हजार शब्दांचा संग्रह फारच उपयोगी आहे. आपण जेवून आलो, खावून आलो, चावून घेतले, धावून आलो असे जे काही शब्द वापरतो. आणि जाऊन, खाऊन, घेऊन, लाऊन,चाऊन असेही वापरतो परंतु यातला जो मूलभूत असा फरक आहे तो आपल्या कधीच लक्षात येत नाही मात्र डॉक्टर यास्मिन शेख यांनी मराठीच्या शुद्धलेखनातून तो फरक नव्या पिढ्यांना सांगितला. त्यामुळे अनेकांच्या जीवनात मराठी भाषा शुद्ध रूपात अवतरली.अशी फार मोठी देणगी डॉक्टर शेख यांनी मराठी माणसांना दिलेली आहे. भाषेच्या वापरात अनेक संभ्रम निर्माण होतात. ते स्पष्टपणे आणि नि:शंकपणे दूर करण्याचे काम डॉक्टर शेख यांनी केलेले आहे. हे करीत असताना त्यांच्या वाट्याला समाजाकडून जी अवमानता यास्मिन मुळे किंवा जेरुसा रूबेनमुळे आली ती त्यांनी अगदी सहजपणे घेतली. हे त्यांचे मोठेपण आपल्याला मान्यच करावे लागेल. अजून किती काळ आपल्यासाठी काम करणाऱ्या गैर बहुसंख्यकांचा आपण उपमर्द करणार आहोत हा प्रश्न आहे. समाज अजून मानसिक दृष्ट्या खूप व्यापक व्हायचा आहे हेच यातून सिद्ध होते. बोली भाषेचा आदर करतानाच मराठी प्रमाण भाषाच असावी याचा आग्रह त्यांनी धरला जरूर परंतु तो दुराग्रहात रूपांतरित होऊ दिला नाही. त्यासाठी त्यांनी विवेकवाद स्वीकारला. अशा व्यक्तिमत्त्वांचा समाजाने आदर केला पाहिजे. त्यांच्या स्मृती जपल्या पाहिजेत आणि त्यांच्या कर्तबदारीला सलाम केला पाहिजे.



## दातृत्वाची भावना प्रत्येकाच्या अंगी असणे गरजेचे- साहेबराव गोसावी यांचे प्रतिपादन

**शहादा, दि.२७ (प्रतिनिधी)- शिक्षणातून परिवर्तन, सेवेतून विकास आणि नेतृत्वातून समाजाची उन्नती होते. प्रत्येकाच्या अंगी दातृत्वाची भावना असणे गरजेचे आहे. गंगोत्रीचा दातृत्वाचा वारसा परंपरेनुसार एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित होत असून हा वारसा आजही अव्याहतपणे सुरू आहे असे प्रतिपादन तालुका एज्युकेशन संस्थेचे संचालक साहेबराव गोसावी यांनी केले.**

गंगोत्री फाउंडेशनच्या अध्यक्षा तसेच विकास प्रतिष्ठानच्या अध्यक्षा प्रिती अभिजीत पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त शहादा तालुक्यातील वडाळी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात रुग्णांना फळवाटप करण्यात आले. यावेळी गोसावी बोलत होते. रुग्णांना फळांचे वाटप करून त्यांच्या प्रकृतीची विचारपूस करण्यात आली. कार्यक्रमास लोकनियुक्त सरपंच जयाताई ठाकरे, माजी संचालक तथा पोलीस पाटील गजेंद्रगिरी गोसावी, ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष प्रतापभाई चव्हाण, पीक संरक्षण सोसायटीचे चेअरमन रवींद्र पाटील, ग्रामपंचायत सदस्य कल्पनाताई मोहिते, ज्येष्ठ महिला संघाच्या मीराताई सोनवणे, सामाजिक कार्यकर्ते मधुगिर गोसावी, छोटू भिल, दादाभाई ठाकरे, प्रकाश जगताप, राकेश माळी, भरत गोसावी, प्रवीण कोळी आदी उपस्थित होते.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सामाजिक कार्यकर्ते तुषार गोसावी, चंद्रकांत रायसिंग, केतन गोसावी, आनंद ठाकरे, किरण चव्हाण, सुमित बैसाणे व संघकार गोडसे यांनी प्रयत्न केले.



## नंदुरबार येथे केंद्रीय सरकारी पेन्शनर्स असोसिएशनची वार्षिक सभा उत्साहात

**नंदुरबार, दि.२७ (प्रतिनिधी)- ऑल इंडिया सेंट्रल गव्हर्नमेंट पेंशनर्स असोसिएशन (पुणे) शाखा नंदुरबारची वार्षिक सर्वसाधारण सभा डी. एस. के. हॉल येथे उत्साहात पार पडली. सभेच्या अध्यक्षस्थानी शाखाध्यक्ष सी. के. पाडवी होते. पुण्याहून असोसिएशनचे सहाय्यक जनरल सेक्रेटरी मनोहर पत्की आणि एस. के. कुळकर्णी विशेष उपस्थित होते.**

मनोहर पत्की यांनी संघटनेच्या कार्याची माहिती देताना पेन्शनर्सच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी असोसिएशन सातत्याने कार्यरत असल्याचे सांगितले. संघटनेचे प्रतिनिधित्व दिल्ली येथील स्कोवा समितीत असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच ८व्या वेतन आयोगाच्या शिष्टमंडळाने पुण्यात येऊन संघटनेच्या पदाधिकाऱ्यांशी चर्चा केल्याची माहिती त्यांनी दिली.

महागाईच्या काळात पेन्शनर्सना सन्मानाने व स्वाभिमानाने जगता यावे, यासाठी पुरेसे पेन्शन मिळणे आवश्यक आहे. त्यांना चांगली वागणूक तसेच दर्जेदार वैद्यकीय सुविधा मिळाल्या पाहिजेत, अशी भूमिका त्यांनी मांडली. बी.एस.एन.एल. पेन्शनर्सप्रमाणे पोस्टाच्या पेन्शनर्ससाठीही पोस्टल पेन्शन पोर्टल सुरू करण्यात येणार असून, त्याद्वारे मोबाईलवर पेन्शन व पगारासंबंधी माहिती मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले.

एस.के. कुळकर्णी यांनी बी.एस.एन.एल. पेन्शनर्सचे १ जानेवारी २०१७ पासून रखडलेले तिसरे पेन्शन रिव्हिजन याबाबत सविस्तर माहिती दिली. सध्या ८० वर्षे पूर्ण झाल्यानंतर पेन्शनमध्ये २० टक्के वाढ केली जाते. त्याच धर्तीवर ६५, ७० आणि ७५ वर्षे पूर्ण झालेल्या पेन्शनर्सच्या पेन्शनमध्ये अनुक्रमे ५, १० आणि १५ टक्के वाढ करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी मांडली. त्यांनी सी.जी. एच.एस. सुविधेबाबतही मार्गदर्शन केले.

मालेगाव येथून आलेले उत्तर विभागाचे संघटन सचिव एस. जी. रोहिदास यांनी संघटनेच्या कार्याची माहिती दिली. शहादा येथील भारत लोंढे यांनीही पेन्शनसंबंधी आपले विचार व्यक्त केले.

सभेच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. साने गुरुजींची प्रार्थना घेण्यात आली. उपस्थित पाहुण्यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी नव्या सभासदांचा तसेच ७५ वर्षे पूर्ण झालेल्या सभासदांचा सत्कार करण्यात आला.

शाखेचे सचिव राधेश्याम सोनार यांनी मागील वार्षिक सभेचे इतिवृत्त तसेच जमाखर्च वाचून दाखविला. त्यास सभासदांनी मंजुरी दिली. व्यासपीठावर उपाध्यक्ष पी. आर. सोनवणे, संघटन सचिव जगन्नाथ बोरसे आणि कोषाध्यक्ष राजाराम निकम उपस्थित होते.

सभेचे सूत्रसंचालन राधेश्याम सोनार यांनी केले, तर अध्यक्ष सी. के. पाडवी यांनी आभार प्रदर्शन करून सभा समाप्त केली. जिल्ह्यातील मोठ्या संख्येने पेन्शनर्स सभेला उपस्थित होते. सभा यशस्वी करण्यासाठी कार्यकारिणी सदस्य जे. के. गावित, जी. के. रघुवंशी, चुनीलाल तांबोळी, ईश्वर तांबोळी, ए. डी. चौधरी आणि आनंदा पाटील यांनी परिश्रम घेतले.

**रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान**

## महिलांच्या सक्षमीकरणासाठी महिलांनीच पुढाकार घेणे गरजेचे- ॲड.कीर्ती पांचाळ

**धुळे, दि.२७- महिलांच्या सक्षमीकरणासाठी सबळीकरणासाठी आता महिलांनी पुढाकार घेणे गरजेचे आहे. सामाजिक उपक्रमातून महिलांना स्वयंरोजगाराची साधने उपलब्ध करून देण्याचा शिवसेना महिला आघाडी व सिद्धनाथ फाउंडेशन यांचा उपक्रम अत्यंत स्तुत्य असून आज या माध्यमातून दिली जाणारी शिलाई मशीन व एम्ब्रॉयडरी मशीन महिलांसाठी निश्चितच उपयोगी ठरणार आहेत असे प्रतिपादन शिवसेना महिला आघाडीच्या संपर्कप्रमुख ॲड. कीर्ती पांचाळ यांनी शिवसेना महिला आघाडी व सिद्धनाथ फाउंडेशन यांच्या माध्यमातून आयोजित करण्यात आलेल्या शिलाई मशीन वाटप कार्यक्रमात केले.**

सदर कार्यक्रमाचे आयोजन स्वामी विवेकानंद कॉलनी अभय कॉलेज परिसर या ठिकाणी शिवसेना महिला आघाडीच्या धुळे जिल्हा संपर्कप्रमुख एड . कीर्ती पांचाळ, जिल्हाप्रमुख अतुल सोनवणे उपजिल्हाप्रमुख नरेंद्र परदेशी, धीरज पाटील महिला आघाडीच्या संगीता जोशी प्रभादेवी परदेशी जयश्री वानखेडे, सुनिता वाघ, अरुणा मोरे, ज्येष्ठ शिवसैनिक बाबुभाई पटेल, प्रा. जे. बी .पाटील उपमहानगर नगर प्रमुख पंकज भारस्कर, व्यापारी आघाडीचे मनोज बंब यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. या कार्यक्रमाचे आयोजन शिवसेना महिला आघाडीच्या ज्योती चौधरी यांनी सिद्धनाथ फाउंडेशनच्या माध्यमातून केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना ज्योती चौधरी यांनी सांगितले की सिद्धनाथ फाउंडेशनच्या माध्यमातून अल्प दरात महिलांना शिलाई मशीन व एम्ब्रोईडरी मशीन वाटप केल्यानंतर महिलांना मोफत शिवण क्लासाचे महिनाभराचे प्रशिक्षण दिले जाणार असून सर्व महिलांनी त्याचा लाभ घ्यावा. याप्रसंगी परिसरातील ५० महिलांना शिलाई मशीनचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सागर निकम यांनी केले सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राजेंद्र चौधरी, राजू चौधरी, रणवीर चौधरी ,पवन चौधरी, शोभा पाटील, सोनी बागुल ,आशा वंजारी ,सोनल मराठे, प्रियंका त्रिवेदी आदींनी परिश्रम घेतले.

## अंजनशाह दाता दरगाह उरूस महोत्सवास प्रारंभ

धुळे, दि.२७- शहरातील पांझरा नदी किनारी असलेल्या पिर अंजानशाह दाता दरगाह येथे दि.२८ ऑगस्ट २०२६ पासुन उरूस महोत्सवानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती आरीफखान महेबुबखान पठाण यांनी दिली. दि.२८ ऑगस्ट रोजी समाधीस्थानी ध्वजारोहण, दि.२९ ऑगस्ट रोजी अभिषेक रात्री ९.३० वाजता करण्यात येईल. संदल शरीफ मिरवणुक दि.३० ऑगस्ट रोजी संध्याकाळी ५ वाजेपासून समाधीस्थळापासून पारंपारिक वाद्यांच्या गजरात मिरवणूक शिवाजी रोड, म.गांधी पुतळा, नगरपट्टी, ग.नं.५, किसनबत्तीवाला खुंट, ताशा गल्ली, मच्छिबाजारातून, सरळ चैनी रोड ते पाचकंदिल येथून आग्रारोड ते सरळ कराचीवाला खुंट येथून जुनी मनपा समोरून सरळ दरगाह पर्यंत काढून समाधी ठिकाणी संदल चढविण्यात येईल. दि.३१ ऑगस्ट रोजी सकाळी दहा वाजेपासून अखंडपणे महाप्रसादाचे वाटप केले जाणार आहे. पंधरा दिवसांच्या उरूस कालावधीत विविध कार्यक्रम होणार आहेत. भाविकांनी कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवहन करण्यात आले आहे.

## वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांना सीए अभ्यासक्रमाचे मार्गदर्शन

धुळे, दि.२७- इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया पश्चिम विभागा अंतर्गत कार्यरत धुळे सीए शाखेच्या वतीने शहरातील विविध शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातील वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांना सीए अभ्यासक्रमा विषयी मार्गदर्शन करण्यात आले.

सीए शाखेचा अभ्यासक्रम व त्या अंतर्गत होणाऱ्या फाउंडेशन परिक्षा, इंटरमिजीएट ग्रुप एक व दोन परिक्षा, आर्टिकलशीप व फायनल परिक्षा इ विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. धुळे सीए शाखेच्या अध्यक्षा सीए सोनी सोनार यांच्या अध्यक्षतेखाली करिअर कौन्सिलर यांच्या सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात आला.





**प्रकाश में आज गंवार**




राजेंद्र कुमार वैजयंती माला. प्राण. निशी जीवन तरूण बोस. ठेविड. गुलशन बावरा

## टायटल व्हेरिफिकेशन जाहीर नोटीस

तमाम जनतेस, सर्व बँका, पतसंस्था व वित्तीय संस्था यांना या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की,

तुकडी जिल्हा धुळे, पोट तुकडी तालुका शिरपूर पैकी मोजे मांडळ, ता.शिरपूर, जि.धुळे शिवारातील बिनशेती सव्हे नं.२६/१/ड/२ मधील प्लॉट नं.५८ व ५९ (एकत्रित क्षेत्र ४९९.९३ चौ.मी.) यात बांधण्यात आलेल्या ''इंद्रमंगल अपार्टमेंट'' मधील पहिला मजल्यावरील रहिवाशी सदनिका नं.१०३, जागेचे क्षेत्र ४५.४५ चौ.मी. (कारपेट एरिया) २इक्ष्य ही मिळकत सदर सदनिकांची चतुसीमा खालीलप्रमाणे :-

पूर्वेस :- सदनिका नं.१०१,
पश्चिमेस :- प्लांटची जागा व नंतर लागून प्लॉट नं.६०,
दक्षिणेस :- प्लॉटची जागा व नंतर लागून स.नं.२५/१अ,
उत्तरेस :- सदनिका नं.१०४,
वरचा भाग :- सदनिका नं.२०३,
खालचा भाग :- पार्किंग

येणेप्रमाणे वर्णन व चतुसीमा असलेली मिळकत ही मे.नवजीवन डेव्हलपर्स इन्फ्रास्ट्रक्चर सर्व्हिसेस मधील भागीदार १) श्री.विशाल इंदरचंद जैन, २) श्री.रितेश इंदरचंद जैन, ३) सौ.शितल विशाल जैन, ४) सौ.सिमा रितेश जैन व ५) श्री.भावेश सुभाषचंद्र अग्रवाल सर्व रा.शिरपूर, ता.शिरपूर, जि.धुळे यांच्या पूर्ण मालकी, ताबा व वहिवाटीतील आहे. सदर मिळकत ही सर्व प्रकारच्या बोजांपासून मुक्त, निर्वंध व निष्कलंक असल्याचे मिळकत मालकांनी सांगून आमचे अशिल यांच्याशी सदर मिळकत विक्री करण्याचा सौदा पक्का केलेला असून, त्याबाबतचा खरेदीचा व्यवहार निश्चित झालेला आहे व लवकरच अंतिम खरेदीखताचा व्यवहार करण्याचे हरविले आहे

तरी सदर मिळकतीवर अथवा तिच्या कोणत्याही भागावर कोणाचाही कसलाही हक्क अधिकार, मालकी, वारसा हक्क, अन्नवस्त्रे, पोटगी, गहाण, दान, लीन, इसार करार (खरेदी करार भाडेपट्टा, बँक कर्ज/बोजा, न्यायालयीन वाद, जप्ती अथवा अन्य कोणताही कायदेशीर वा आर्थिक बोजा किंवा हितसंबंध असल्यास, अशा व्यक्ती, बँक अथवा वित्तीय संस्थांनी ही नोटीस वर्तमानपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ०७ (सात) दिवसांच्या आत आपल्या हरकतीचे कायदेशीर व अस्सल कागदपत्रांच्या पुराव्यानिशी खालील पत्त्यावर लेखी स्वरुपात समक्ष संपर्क साधावा.

वृत्तपत्रात परस्पर प्रसिद्ध केलेल्या हरकती किंवा विहित मुदतीनंतर आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत. मुदतीत कोणतीही वैध व कायदेशीर हरकत प्राप्त न झाल्यास सदर मिळकतीवर कोणाचाही कोणताही हक्क, हितसंबंध अथवा बोजा नाही आणि असल्यास तो त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिला आहे, असे मानून आमचे अशिल सदर मिळकतीचे अंतिम खरेदीखत नोंदवून घेतील व व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कोणतीही तक्रार अथवा हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

सदर जाहीर नोटीस ही आमचे अशिलांनी दिलेल्या माहिती व सूचनेवरून जनहितार्थ व टायटल व्हेरिफिकेशनकामी प्रसिद्ध करण्यात येत असे. ठिकाण- शिरपूर, दिनांक- २७/०८/२०२६.

**ॲड.रोशन एम.परदेशी**
ऑफिस- न्यायालयच्या गेट समोर, मेन रोड, शिरपूर, जि.धुळे.
**मो.नं.९८९०९८७६१०**

## टायटल व्हेरिफिकेशन जाहीर नोटीस

तमाम जनतेस. सर्व बँका, पतसंस्था व वित्तीय संस्था यांना या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की-

मौजे मांडळ, ता.शिरपूर, जि.धुळे येथील भूमापन क्रमांक व उपविभाग ४१/५६/२/ब पैकी प्लॉट नं.३५ (खाते क्रमांक ९८२८, भोगवटादार वर्ग-१)

येणेप्रमाणे वर्णन असलेली मिळकत ही श्री.उमेश पुरुषोत्तम पटेल यांच्या पूर्ण मालकी, ताबा व वहिवाटीतील आहे. सदर मिळकत ही सर्व प्रकारच्या बोजांपासून मुक्त, निर्वंध व निष्कलक असल्याचे मिळकत मालकाने सांगून आमचे अशिल यांच्याशी सदर मिळकत विक्री करण्याचा सौदा पक्का केलेला असून, त्याबाबतचा खरेदीचा व्यवहार निश्चित झालेला आहे व लवकरच अंतिम खरेदीखताचा व्यवहार करण्याचे ठरविले आहे.

तरी सदर मिळकतीवर अथवा तिच्या कोणत्याही भागावर कोणाचाही कसलाही हक्क अधिकार, मालकी, वारसा हक्क, अन्नवस्त्र, पोटगी, गहाण, दान, लीन, इसार करार (खरेदी करार) भाडेपट्टा, बँक कर्ज/बोजा, न्यायालयीन वाद, जप्ती अथवा अन्य कोणताही कायदेशीर वा आर्थिक बोजा किंवा हितसंबंध असल्यास, अशा व्यक्ती, बँक अथवा वित्तीय संस्थांनी ही नोटीस वर्तमानपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ०५ (पाच) दिवसांच्या आत आपल्या हरकतीच कायदेशीर व अस्सल कागदपत्रांच्या पुराव्यानिशी खालील पत्त्यावर लेखी स्वरूपात समक्ष संपर्क साधावा.


वृत्तपत्रात परस्पर प्रसिद्ध केलेल्या हरकती किंवा विहित मुदतीनंतर (५ दिवसांनंतर) आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत. मुदतीत कोणतीही वैध व कायदेशीर हरकत प्राप्त न झाल्यास सदर मिळकतीवर कोणाचाही कोणताही हक्क, हितसंबंध अथवा बोजा नाही आणि असल्यास तो त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिला आहे, असे मानून आमचे अशिल सदर मिळकतीचे अंतिम खरेदीखत नोंदवून घेतील व व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कोणतीही तक्रार अथवा हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

सदर जाहीर नोटीस ही आमचे अशिलांनी दिलेल्या माहिती व सूचनेवरून जनहितार्थ व टायटल व्हेरिफिकेशनकामी प्रसिद्ध करण्यात येत असे.

ठिकाण- शिरपूर, दिनांक- २७/०८/२०२६.

**ॲड.रोशन एम.परदेशी**
ऑफिस- न्यायालयच्या गेट समोर, मेन रोड, शिरपूर, जि.धुळे.
**मो.नं.९८९०९८७६१०**


## शब्दकोडे क्रमांक: २४४१



**आडवे शब्द :** १.गती ३.एक सुकामेवा ५.मानहानी, नाचक्की ८.रुग्णालय, जिथे आजारी लोकांवर उपचार केले जातात ९.सुंदर स्त्री किंवा महिला ११.संमती न देणे, विरोध दर्शवणे १३.गणितातील वजा करण्याची क्रिया १४.इंग्रजी वर्णमालेतील चौथे वर्ण १५. जुने नाणे किंवा पैशांचे एक परिमाण १७.जेवणाची थाळी १९.इच्छा नसणे,नकारार्थी शब्द २०.सखोल विचार करणे किंवा चिंतन करणे २२.सख्खी किंवा नात्यातील भगिनी २४.अडचण किंवा गरज २६.अत्यंत वाईट स्थिती किंवा हाल झालेली अवस्था २७. शिकार किंवा चोराला पकडण्याचे साधन २८.नाश करणे किंवा मारणे ३०. एक सुवासिक फुल ३१.पूर्वीच्या काळी शाईने लिहिण्यासाठी वापरली जाणारी लेखणी ३२.सत्य, प्रामाणिक ३४.दागदागिने किंवा शृंगार ३५. बिना हाडाचे तळलेले वा निखाऱ्यावर भाजलेले बोकडाचे मांस ३८.वायू,वातावरण ४०.सेवा करणारी स्त्री,नोकराणी ४१.वादळाचा फटका ४३.संगीत सप्तकातील चौथा स्वर ४४.अविरत ४६.मीता-उलट लिहा ४८.एक कृत्रिम कालवा ४९.संदेश पाठवण्याचे जुने माध्यम किंवा धातूची दोरी ५०.संशय किंवा अडचण ५१.झाडेझुडपे ५२.कृष्ण, सावळा रंग.५३.गुणांची किंवा वस्तूची केलेली चाचणी

**उभे शब्द :** १. प्राचीन हिंदू धर्मग्रंथ २.एक शेंगभाजी ३.नकली ४.मुंबईच्या दक्षिण-पश्चिम किनारपट्टीचा उच्चभ्रू भाग ५. आमिर खान,काजोल यांचा एक सिनेमा ६. एक म्हण 'पळसाला पाने **' ७.अनाथ मुलगा,ज्याला आई-वडील नाहीत १०.इंग्रजीत-नशीबवान किंवा भाग्यवान १२. ९० अंशाचा कोन १६.प्रभू रामचंद्र १७.गाण्यातील एक सूर किंवा लय २१.वंदन २२.अर्पण करणे किंवा बहाल करणे २३. सणसणीत हाणलेली थोबाडीत २५.भगवान शंकराचे वाद्य २७.एक टिकाऊ लाकूड २८.महाराष्ट्रातील २९.हाताच्या बोटांवरील कडक आवरण ३०.गणती ३१.तोतरा ३३.मार्ग-हिंदीत ३६.खबर ३९.इच्छा ४२.सुकलेले खजूर ४५.लावणी नृत्य सादर होते तो नृत्य प्रकार ४६.एक आदिवासी नृत्य प्रकार ४७.बी भारताच्या शेजारील एक देश ४८.नवरा ५०.समुद्रात मिळणारे एक मंगल वाद्य

### शब्दकोडे क्रमांक : २४४० चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रे | र | णा | | का | च | | अ | भि | वा | द | न |
| र | त | | प्रि | या | | ह | ल | का | | वा | र |
| क | ला | वं | त | | घी | | वा | री | स | | म |
| | म | द | म | स्त | | श | र | | र | वा | |
| रू | | न | | व | रा | ह | | आ | ग | म | न |
| त | प | | ना | न | | र | जा | | म | | ज |
| बा | रा | ख | डी | | दा | | व | डा | | हा | र |
| | त | र | | व | न | रा | ई | | जा | त | |
| प्र | | व | सा | | व | जा | | चु | ल | | प |
| त | पा | स | | पा | | बा | र | का | | शी | र |
| | व | | इ | ड | लिं | बू | | मू | क | | व |
| म | टा | र | | वा | क | | चा | क | | खो | ड |

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था आणि संबधीतांना सदर जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

**मिळकतीचे (बखळ प्लॉट) वर्णन**- तु.जि.धुळे पो.तु.ता.धुळे पैकी शहर धुळे म.न.पा. हद्दीतील देवपूर भागातील, बिनशेती मंजूर व ले-आऊट मंजूर झालेला सर्व्हेनंबर-४९/१ पैकी प्लॉट नंबर-७४ याचे ७/१२ नुसार क्षेत्र सु.चौ.मिटर- ५४०.६९ यास विस्तारीत सि.स.नं.४२५५ असा लागला असून त्यात क्षेत्र सु.चौ.मिटर- ५४१.४० असे नमूद आहे.

यास चतु:सिमा- पुर्वेस- प्लॉट नं.७५, पश्चिमेस- प्लॉट नं.७३, दक्षिणेस- प्लॉट नं.८९, उत्तरेस- सुमारे ३० फूटी वापर व रस्ता,

येणे प्रमाणे वरील प्रमाणे वर्णनाचा बखळ प्लॉट हा- (१) श्री.रघुविर देबुराम जांगिड- पत्ता- प्लॉट नं.७, साईबाबा मंगल कार्यालय जवळ, नकाणे रोड, देवपूर, धुळे. (२) श्री.सुरेश रामेश्वर बाजिया- पत्ता- प्लॉट नं.१२, शिवराय नगर, देवपूर, धुळे. (३) सौ.राजकुमारी महेन्द्रकुमार गडवाल- पत्ता- प्लॉट नं.१३९, इन्कमटॅक्स कॉलनी, नकाणेरोड, देवपूर, धुळे.

असे यांचे मालकीचा व ताबेउपभोगातील आहे.

सदरचा प्लॉट हा आमचे पक्षकार यांनी कायमस्वरुपी विकत घेण्याचा सौदा केलेला असून सदर प्लॉटच्या तोंडी सौदापोटी आमचे पक्षकाराकडून त्यांनी बयाणा रक्कम देखील स्विकारली आहे. आमचे पक्षकार सदरचा व्यवहार लवकरच पूर्ण करणार आहेत. तरी वर उल्लेख केलेल्या प्लॉटवर कोण्या व्यक्तीचा, संस्थेचा, पतपेढी, बँक, वित्तीय संस्था, इत्यादी चा काही बोजा, कर्ज, तारण, गहाणखत, बक्षिसपत्र, मृत्यूपत्र, लिजडीड, जनरल मुखत्यार पत्र, सौदापावती, टांच, वारसा हक्क, दावे, अर्जफाटे, हितसंबध, तक्रार, अथवा हरकत, असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांचे आत खालील पत्यावर संबधीत मुळ कागद पत्रासह, तसेच लेखी पुराव्यासह संपर्क साधून प्रत्यक्ष भेटून शहनिशा करुन खात्री करुन द्यावी. अन्यथा उक्त मुदतीत कोणाचीही हरकत, तक्रार, न आल्यास, सदर प्लॉट हा निर्बोज, निर्वीवाद, निर्वेध, आहे असे समजून सदर प्लॉटचा रजिष्टर खरेदीचा व्यवहार आमचे पक्षकार पूर्ण करतील. त्यानंतर आलेल्या हरकती अथवा तक्रारी हया ग्राहय धरल्या जाणार नाही. तसेच परस्पर वर्तमानपत्रातून घेतलेल्या हरकती हया ग्राहय धरल्या जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस ही आमच्या पक्षकारांनी दिलेल्या माहिती, अधिकार व सांगण्यावरुन त्यांचे तर्फे आमचे मार्फत प्रसिध्दीस दिली असे.

दिनांक- २८/०८/२०२६.

**ॲड.गणेश केशव कुलकर्णी**
लेन नं.१०, नेहरूनगर, देवपूर, धुळे-४२४००२.
**मो.नं.९४०३६३९४७५**

## हस्ती पूर्व प्राथ.विभागात रक्षाबंधनानिमित्त स्पर्धा

धुळे, दि.२७- हस्ती चॅरिटेबल ट्रस्ट संचलित हस्ती पूर्व प्राथमिक विभागातर्फे रक्षाबंधनाच्या निमित्ताने राखी बनविणे व थाळी सजावट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. शाळेचे चेअरमन कैलास जैन यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या उपक्रमाला पालकांचा उत्स्फूर्त व भरभरून प्रतिसाद लाभला. पालकांनी आपल्या पाल्यांसोबत उत्साहाने सहभागी होत सर्जनशीलतेचा सुंदर आविष्कार घडविला.

स्पर्धेत पालकांनी आकर्षक व पर्यावरणपूरक राख्या तयार केल्या, तसेच विविध साहित्याचा कल्पक वापर करून सुंदर थाळी सजावट साकारली. पारंपरिक संस्कृती, सर्जनशीलता आणि पर्यावरणपूरकतेचा सुंदर संगम या उपक्रमातून पाहायला मिळाला. पालक व विद्यार्थ्यांनी एकत्रितपणे केलेल्या सहभागातून त्यांच्यातील प्रेम, सहकार्य आणि उत्तम बॉण्डिंग अनुभवायला मिळाले. रक्षाबंधनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रेम, बंधुभाव, नात्यांची जपणूक, सर्जनशीलता तसेच पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व समजावे, हा या उपक्रमाचा उद्देश होता. स्पर्धेतील विजेत्या पालकांना बक्षीस देऊन गौरविण्यात आले. तसेच सहभागी सर्व विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र देऊन त्यांच्या उत्स्फूर्त सहभागाचे कौतुक करण्यात आले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्याध्यापिका पूनम पाटील, स्मिता साठे व माधुरी पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद आणि विद्यार्थ्यांचा आनंदी सहभाग यामुळे हा उपक्रम उत्साहात व संस्मरणीय वातावरणात पार पडला.

## बालसंगोपन योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्यासाठी शिबिर

शहादा, दि.२७- तालुक्यातील ० ते १८ वयोगटातील अनाथ, निराधार, एकल पालक असलेली बालके, कर्करोग, एच.आय.व्ही आजाराने ग्रस्त पालकांची बालके, कोरोना काळात निधन झालेल्या पालकांची बालके, विधवा विधुर, घटस्फोटीत पालकांची बालके ज्यांचे वय ० ते १८ दरम्यान आहे अशा बालकांसाठी शासनातर्फ क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजना राबवली जात असून बालकांच्या संगोपन शिक्षणासाठी बालकांना दरमहा २२५०/- रुपये लाभ दिला जातो. या योजनेचा लाभ घेण्यासाठी युवकमित्र परिवार कोठली या शासनामान्यताप्राप्त संस्थेमार्फत दि.२८ ऑगस्ट रोजी महात्मा फुले स्मारक, स्टेट बँक समोर शहादा येथे कॅम्पचे आयोजन करण्यात आले आहे.

## DECLARATION

Here By Declare that my **Old name : DHANANI EMTHIYAJ HAJIELYAS** Has been changed to **New Name : IMTIYAZ ILIYAS DHANANI** So Now Onward All Official Work Must Be Done By My New Name
**ADD- DATTA COLONY, DONDAICHA ROAD, SHAHADA, TAL.SHAHADA, DIST.NANDURBAR 425409**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे अवधान, ता.जि. धुळे येथील गट नं.१०३/५/१०३/६ पैकी प्लॉट नं.६६ चे क्षेत्र १५५ चौ.मी. यांसी चर्तु:सिमा- पुर्वेस : रस्ता, पश्चिमेस : प्लॉट नं.८६, दक्षिणेस : प्लॉट नं.६७, उत्तरेस : प्लॉट नं.६५. येणे प्रमाणे वर्णनाची बखळ प्लॉट मिळकत शकील अहमद मोहमद हुसेन, रा. गल्ली नं.७, कसाब वाडा, धुळे यांचे मालकीची असून त्यांनी वर नमूद मिळकत कायमस्वरूपी विकण्याचा सौदा आमचे अशिल १) श्री.हर्षल संजय भंडारी, रा.दिल्लीवाला जीन, पारोळा रोड, धुळे २) श्री.दिपक प्रभाकर कुलकर्णी, रा. गल्ली नं.१४, जुने धुळे, धुळे याच्यांशी केला आहे.

आमचे अशिलांना सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करावयाचा आहे. तरी सदर मिळकतीबाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, तारण, करार, सौदा, कब्जा, विसार पावती, अन्नवस्त्र, मृत्यूपत्र, बक्षिसपत्र, मुखत्यारपत्र, कब्जापावती, सॉलवन्सी, आरक्षण, रक्कम देणे/घेणे इ. असल्यास अथवा सदर मिळकतीचे कोणतेही मूळ दस्त जमा/ तारण असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांचे आत योग्य त्या कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रतीसह आमच्या कार्यालयात लेखी हरकत नोंदवावी. तोंडी हरकत किंवा परस्पर वर्तमान पत्रात प्रसिध्द केलेल्या व मुदतीनंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. मुदतीत व योग्य त्या पुराव्यानिशी प्रत्यक्ष आमच्या कार्यालयात हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनबोजाची आहे असे समजून संबंधितास तसा दाखला देण्यात येईल व आमचे अशिल त्यांचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील, त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत आमचेवर बंधनकारक असणार नाही.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या माहितीवरून व सांगणेवरून आमचेमार्फत प्रसिध्दीस दिली असे.

धुळे, दिनांक:- २६/०८/२०२६.

**ॲड.विजय म.मोरे**
नोटरी- भारत सरकार
रा.बी/१२, भन्साली प्लाझा, नगरपट्टी, धुळे
**मो.नं.९८२२८५२६५०**

## जाहीर समन्य

### धुळे येथील मे.जिल्हा व सत्र न्यायाधिश सो., यांचे न्यायालयात

कि.दिवाणी अपील नं.१३५/२०२५

अरूण रायबा पाटील ....अपेलंट
विरूध्द
विमलबाई अरूण पाटील ....रिस्पॉडट

ज्याअर्थी अर्जदार यांनी धुळे येथील मे.जिल्हा व सत्र न्यायाधिश सो. यांचे न्यायालयात किरकोळ दिवाणी अपिल दाखल केले आहे.

तसेच रिस्पॉडट यांना त्यांनी दिलेल्या पत्यावर नोटीस बजावणी होत नसल्याने सदरची जाहिर समन्स देणे भाग झाले आहे.

प्रस्तुत अपिलातील रेस्पॉडन्ट श्रीमती विमलबाई अरुण पाटील, रा.वडजाई, ता.जि.धुळे यांना नोटीसची बजावणी झालेली नाही.

त्याअर्थी जाहीर समन्स द्वारे रेस्पॉडन्ट श्रीमती विमलबाई अरुण पाटील यांना सूचित करण्यात येते की, प्रस्तुत अपिलातील दि.११/९/२०२६ रोजी मा.धुळे येथील मे.जिल्हा व सत्र न्यायाधिश ॲडहॉक-१ सो. यांचे न्यायालयात सकाळी ११:०० वा. स्वत: अथवा वकीला मार्फत हजर रहावे अन्यथा प्रस्तुत अपिलात एकतर्फा आदेशपारीत करण्यात येईल.

सदर नोटीस मे.न्यायालयाचे सहीशिक्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

स्थळ- धुळे,
दिनांक- १४/०८/२०२६
जिल्हा व सत्र न्यायालया धुळे (शिक्का) सहाय्यक अधिक्षक

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस, संबंधितांना, वित्तीय संस्था, बँका, पतसंस्थांना आणि सावकारांना सदर जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे मोहाडी प्र.ल येथील महानगरपालिका हद्दीतील.

ग.नं.३३/३ पैकी १) प्लॉट नं.१५ चे एकूण क्षेत्र २७६.०० चौ.मी. बखळ प्लॉट. २) प्लॉट नं.१६ चे एकूण क्षेत्र २२८.०० चौ.मी. बखळ प्लॉट हे १) साजिद खान दस्तगीर खान पठाण रा. फिरदोस नगर, धुळे २) शुबुर लतीफ शेख रा. गजानन कॉलोनी, वडजाई रोड, धुळे यांच्या मालकीची व प्रत्यक्ष ताबा उपभोगातील असून चतु:सिमा व मापे मंजूर नकाशाप्रमाणे.

मिळकतीचे मालक यांनी वर नमूद मिळकत कायमस्वरुपी विक्रीचा आमचे अशिलांन सोबत सौदा केलेला असून बयाणापोटी रक्कम स्विकारलेली आहे. आमचे अशिल हे सदरील मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करणार आहे.

सबब वर नमूद मिळकतीबाबत इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हिस्सा, हितसंबंध, टाच, बोजा, वारसा हक्क, हस्तांतरण व्यवहार, खरेदी, सौदापावती, कोर्ट कचेरी, बक्षीसपत्र, गहाण, मृत्युपत्र, मुखत्यार पत्र, सरकारी अगर निमसरकारी आरक्षण वगैरे व्यवहार असल्यास त्यांनी जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ५ (पाच) दिवसांचे आत खालील पत्त्यावर कायदेशीर कागदपत्रांसह लेखी हरकत कळवावी.

येणेप्रमाणे सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकत निर्बोज म्हणून खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत सदर मिळकतीवर व आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. परस्पर वर्तमानपत्रात घेतलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. कळावे.

सदरची जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या अधिकारावरून, माहितीवरून व सांगणेवरून आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.

धुळे, दिनांक- २७/०८/२०२६.

**ॲड.दानिश अहमद अ.रऊफ (शेख)**
पहिला मजला, अन्सार मस्जिद समोर, ८० फुटी रोड, तिरंगा चौक, धुळे.
**मो.नं.९८८१९२९४२४**

## धुळे महानगरपालिका, धुळे

महानगरपालिका नविन प्रशासकीय इमारत, गुरुशिष्य स्मारक, साक्री रोड, धुळे

जा.क्र. धुमपा/नर/४०७/२०२६-२७ नगररचना विभाग दिनांक :-२७/०८/२०२६

### जाहिर नोटीस

तमाम नागरिकांना कळविणत येते की, धुळे महानगरपालिका मौजे मोहाडी गट क्र. २४/१, २६/१, २७, २८, ३९ प्लॉट नं.६५ सि.स.क्र.१२ च्या जागेत अर्जदार श्री.धीरज कन्हैय्यासिंग परदेशी यांना पिठाची गिरणी व्यवसाय करणेस व त्यासाठी नाहरकत दाखला मिळणेबाबत अर्ज सादर केलेला आहे. तसेच सदर जागेवर पिठाची गिरणी व्यवसाय परवानगी देणेस कोणत्याही प्रकारे हरकत घ्यावयाची असल्यास त्याबद्दलची लेखी तक्रार अर्ज दि.१०/०९/२०२६ पावेतो कार्यालयीन वेळेत मुदतीत दाखल करावी.

वरील मुदतीत कोणत्याही प्रकारे लेखी तक्रार न आल्यास धुळे महानगरपालिका अर्जदार यांना पिठाची गिरणी व्यवसाय करणेस व त्यासाठी परवानगी देणेसाठी योग्य तो विचार करणेत येईल.

विहीत मुदतीनंतर प्राप्त हरककती अर्ज महानगरपालिकेवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

सहा.अभियंता
धुळे महानगरपालीका

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नाटीसी अन्वये कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन**:- मौजे देवपूर येथील धुळे म.न.पा. हद्दीतील मिळकत ''मौजे देवपूर येथील स.नं.१५/१ पैकी प्लॉट नं.२९ चे एकूण क्षेत्र ४८३.०१ चौ.मी. यास सि.स.नं. ३२६६ चे क्षेत्र ४८४ चौ.मी. यापैकी २६०० चौ.फुट (२४१.६३ चौ.मी.) उत्तरेकडील भाग''

उपरोक्त वर्णनाची मिळकत दिनांक १५/०२/१९८९ रोजी रक्कम रु.२०,०००/- मात्र वर सौ.प्रमिला युवराज ठाकूर यांनी रजिष्टर्ड खरेदीखताने श्री.विकास नारुमल लुल्ला यांचे कडून विकत घेतली होती

दिनांक २७/०१/१९९६ रोजी सौ.प्रमिला युवराज ठाकूर व दिनांक १७/०६/२०१२ रोजी श्री.युवराज फकीरा ठाकूर हे मयत झाल्यामुळे त्यांचे वारस श्री.धर्मराज युवराज ठाकूर वगैरे त्यांची नावे उपरोक्त मिळकतीस वारस म्हणून लागलीत.

दिनांक ०२/०८/२०१७ रोजी सर्व ९ पैकी ८ वारसांनी श्री.पंकज युवराज ठाकूर यांचे नावे रजिष्टर्ड दस्त क्र.२४८९ दिनांक ०२/०८/२०१७ रोजी विना मोबदला हक्क सोड पत्र लिहून नोंदवून दिले.

दिनांक १५/०२/१९८९ रोजीचे मूळ खरेदीखत व दिनांक ०२/०८/२०१७ रोजीचे मूळ विना मोबदला हक्क सोडपत्र हे हरवले आहेत ज्या कोणास उपरोक्त खरेदीखत व विना मोबदला हक्क सोडपत्र सापडले असतील त्यांनी ते खालील पत्त्यावर आणून द्यावे आणून देणाऱ्यास योग्य ते बक्षीस अथवा मोबदला देण्यात येईल.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

सदरची नोटीस आमचे मार्फत पक्षकाराने दिलेल्या माहितीवरुन प्रसिध्दीस दिली असे. ठिकाण- धुळे, दि.२७/०८/२०२६.

**ॲड.श्री.डी.वाय.खैरनार**
प्लॉट नं.८क, फुले कॉलनी, धुळे. **मो.नं.९८२२८५००५०**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था, खाजगी सावकार व सर्व संबंधीतीयांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, तु.जि.धुळे, पो.तु.ता. धुळे पैकी धुळे महानगरपालिका हद्दीतील मौजे वलवाडी, ता.जि.धुळे हद्दीतील स.नं. ९०/१/ब/२ पैकी प्लॉट नं.१८ पैकी पुर्वेकडील भागाचे क्षेत्र १३५ चौ.मी., १३७२ चौ.फुट अशी बांधीव मिळकत त्यात असलेले ३ रुम, संडास, बाथरूम सदरील मिळकतीच्या चतु: सिमा खालीलप्रमाणे-

| दिशा | चतु:सिमा |
|---|---|
| पुर्वेस- स.नं.९०/१/ब/३, | पश्चिमेस- प्लॉट नं.१८ चा उर्वरीत, |
| दक्षिणेस- प्लॉट नं.१९, | उत्तरेस- रस्ता |

येणेप्रमाणे मिळकतीचे मालक श्री.विश्वास वामन वाणी, रा.प्लॉट नं.१८ब- बिजली नगर, नकाणे रोड, देवपूर, धुळे हे असून त्यांनी आमचे पक्षकार यांच्या सोबत कायम विक्रीचा सौदा करणार असून आमचे पक्षकार सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करणार आहेत.

सदर मिळकत बाबत कोणाचे काही हक्क, हितसंबंध, तारण, गहाणखत, सौदा पावती, बोजा, मुखत्यारपत्र, बक्षिसपत्र, तसेच इतर काही हक्क, हितसंबंध, अगर तक्रार असल्यास, मुळ कागदपत्रा सोबत आपली लेखी हरकत ७ (सात) दिवसाच्या आत सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून खालील दिलेल्या पत्यावर कळवावे. नियोजीत कालावधीमध्ये कोणाचीही कोणत्याही स्वरुपाची हरकत न आल्यास सदरची मिळकत ही निर्बोज व निर्वेध आहे असे गृहित धरुन आमचे पक्षकार सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर आलेल्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही. तसेच सदर हरकत आमच्या पक्षकारावर व प्रस्तुत मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही याची गांभीर्याने नोंद घ्यावी. तसेच परस्पर वर्तमान पत्रात हरकत घेतल्यास ती देखील आमच्या पक्षकारावर व सदर मिळकतीवर बंधनकारक असणार नाही.

येणेप्रमाणे जाहिर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या माहिती व दस्तऐवजावरुन त्यांचे तर्फे आमचे मार्फत प्रसिध्दीस दिली असे. कळावे.

येणेप्रमाणे जाहिर नोटीस असे. ठिकाण- धुळे, दि.२७/०८/२०२६.

**ॲड.राहुल एफ. पाटील,** (नोटरी भारत सरकार)
निवास/कार्यालय- प्लॉट नं.१, एस.आर.पी.एफ. कॉलनी, नकाणे रोड, देवपूर, धुळे. **मो.नं.९९२१२२१९१०**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था व सर्व सबंधीतांना या जाहिर नोटिसीनी कळविण्यात येते की मौजे धुळे येथील स.नं.३१३/२अ यातील प्लॉट नं.११ यासी विस्तारीत सि.स.नं.११४७१ चे क्षेत्र १००० चौ.फुट सामाईकातील अविभक्त पुर्वे कडील उत्तराभिमुख निम्मा (अर्धा) बखळ प्लॉट यासी चतुसीमा खालील प्रमाणे....

| | |
|---|---|
| पुर्वेस- | प्लॉट नं.१८, |
| पश्चिमेस- | ६ मी रस्ता व याच प्लॉटचा उर्वरित भाग, |
| दक्षिणेस- | प्लॉट नं.१२, |
| उत्तरेस- | ९ मी रस्ता. |

येणेप्रमाणे वर्णनाची मिळकत ही श्री.संजय जीवनलाल बंब रा.सुभाष नगर जुने धुळे ता.जि.धुळे यांच्या मालकी व ताबे व कब्जे उपभोगातील असून सदर मिळकत त्यानी कायमस्वरूपी खरेदी खतान विकण्याचा तोंडी सौंदा आमचे पक्षकारा सोबत केला असून आमचे पक्षकार लवकरच सदर मिळकतीचे खरेदीखत मा दुय्यम उपनिबंधक धुळे यांच्या कार्यालयात नोंदविणार आहे.

सबब, या जाहिर नोटिसीनी सर्व संबधिताना कळविण्यात येते की, वर नमुद वर्णनाच्या मिळकतीबाबत वर नमूद मिळकत मालकांशी कोणाचाही कोणत्याही स्वरूपाचा खरेदी, विक्री, तारण, गहाणखत, सौदा, लिज, भाडेकरार, बक्षिसपत्र, जनरल अगर स्पेशल मुखत्यार इ. कोणत्याही प्रकारचा हक्क व अधिकार अगर हरकत व तक्रार असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसाच्या खाली नमूद पत्यावर योग्य त्या कागदपत्रा सहीत लेखी स्वरूपात नोंदव्यात. वरील मुदतीत कोणाच्याही कोणत्याही प्रकारच्या लेखी हरकती अगर म्हणणे न आल्यास सदर मिळकती हया निर्वेध व निर्बोज असल्याचे समजून आमचे पक्षकार खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. तसेच वर नमूद मुदती नंतर आलेल्या अगर परस्पर वर्तमान पत्रात जाहीर नोटीस प्रसिध्द करून घेतलेल्या हरकती आमच्या पक्षकारा वर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

सदर जाहिर नोटिस आमच्या पक्षकाराने सांगितल्यावरून आज रोजी आमचे मार्फत प्रसिध्दीस दिली असे.

धुळे, दिनांक- २८/०८/२०२६. नोटीस देणार तर्फे ॲड.

**ॲड.राहुल सुभाष शिकारे,** नोटरी भारत सरकार
१५, रामचंद्र नगर, पारोळा रोड, धुळे. **मो.नं.९४२२२१७८६७**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस, बॅक, वित्तीय संस्था, भागिदारी फर्म सोसायटी, धर्मदाय व सहकारी संस्था यांना या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की,

मौजे पुरमेपाडा ता.धुळे जि.धुळे महसुल धुळे हद्दीतील, सि.स.नं./गट नं. १९८/१/अ चे एकूण क्षेत्र ०१ हेक्टर २० आर. पैकी निम्मे क्षेत्र उत्तरे कडील भाग म्हणजेच ०.६६ आर आकार १ रु. ६० पैसे यासी चतु:सिमा मंजुर नकाशा प्रमाणे सदरची मिळकत हि बायजाबाई तुकाराम खांडेकर, अरोस्तोलबाई संजय पाटील, अलकाबाई योगेश पाटील, जिजाबाई आप्पा पाटील, दिनेश गोविंद पाटील, धृपदाबाई लोटन पाटील, बापु भटु पाटील, मंगलबाई तानाजी पाटील, मिनाबाई एकनाथ पाटील, लक्ष्मीबाई गोविंद पाटील, संजय लोटन पाटील, सिंधुबाई नारायण पाटील, सुनिताबाई रविंद्र पाटील, इंदुबाई सोमनाथ सुर्यवंशी, नंदाबाई एकनाथ पाटील, भटु एकनाथ पाटील, लोकेश एकनाथ पाटील, अनुसयाबाई जगन्नाथ मासुळे, प्रवीण जगन्नाथ मासुन, रवींद्र जगन्नाथ मासुळे रा.पुरमेपाडा ता.धुळे जि.धुळे यांच्या सामायिक हिस्स्याची आहे. सदर मिळकत हि त्यांचे मालकी व कब्जे उपभोगातील मिळकत असून सदर मिळकत हि आमचे अशिल श्रीमती.अलकाबाई भिकन सुर्यवंशी रा.धुळे, ता.जि.धुळे यांनी कायमस्वरूपी विकत घेण्याचा व्यवहार केलेला आहे तसेच त्यासंदर्भात सौदा निश्चित केलेला असून लवकरच रजिस्टर खरेदीखत नोंदविणार आहेत. म्हणून सदर मिळकतीवर कोणाचाही काहीही हक्क, अधिकार, लिज, टाच, बोजा, जप्ती, बक्षिस, गहाण, खरेदी, विक्री, ताबा किंवा इतर कोणत्याही काही हक्क व अधिकार असल्यास किंवा सदर मिळकतीचे खरेदीबाबत कोणाचीही काहीही हरकत, अडथळा असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाल्याच्या ०७ दिवसाचे आत खालील नमुद पत्यावर लेखी म्हणणे सादर करावे. मुदतीत लेखी म्हणणे सादर न केल्यास या मिळकतीबाबत कोणाचीही काहीही हरकत नसल्याचे समजून आमचे अशिल पुढील खरेदीचा व्यवहार करतील. तसेच या नोटीसीस कुणाचेही काहीही म्हणणे किंवा हरकत, कोणीही परस्पर वृत्तपत्रांमध्ये प्रसिध्द केल्यास ते आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी. ठिकाण- धुळे, दिनांक- २८/०८/२०२६.

**ॲड.मयुर मेघराज बैसाणे**
(जिल्हा व सत्र न्यायालय, धुळे)
ऑफिस- गार्डन प्रेस, विष्णु नगर,
चितळे माध्यमिक विद्यालय जवळ, देवपूर, धुळे-४२४००२.
**मो.नं.९८८११६८३४६, ९८६०९०२९६३**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस, सर्व हितसंबंधीतांना तसेच सर्व वित्तीय संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था यांना या जाहीर नोटीसी द्वारे कळविण्यात येते की, खालील परीशिष्ठात नमूद केलेल्या मिळकती संदर्भात आमचे अशिल आमचे अशिल श्री.मोहन कन्हैय्यालाल चित्ते, रा.धुळे यांनी परिशिष्टात नमूद मिळकतीचे मालक १) श्री.राजीव मोहनलाल अग्रवाल, २) श्रीमती हर्षल राजीव अग्रवाल दोन्ही रा. प्लॉट नं.१७, अग्रवाल नगर, धुळे यांचे सोबत परिशिष्टात नमुद मिळकत विकत घेणे संदर्भात लेखी सौदा केलेला असून सौदया प्रमाणे पुर्तता करुन देण्यास आमचे अशील तयार असतांना देखील मिळतीचे मालक हे सौदया प्रमाणे पुर्तता करुन देण्यास कुचराई करत आहेत. श्रीमती हर्षल राजीव अग्रवाल हे सदर परिशिष्टात नमूद मिळकती विकण्याच्या तसेच त्रयस्त हक्क निर्माण करण्याच्या तयारीत आहेत.

तरी सदर मिळकतीबाबत कोणीही कोणत्याही प्रकारचे खरेदी खत, मालकी हक्क, सौदे हिस्सा, हितसंबंध, गहाण, बोजा, टाच, जप्ती, भाडेपट्टा, ताबा हक्क, वहीवाट हक्क, करार या अन्वये अधिकार हक्क वै. निर्माण करू नये केल्यास सदर व्यवहार आमचे अशिल आणि सदर मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही.

**मिळकतीचे वर्णन**

अ) मौजे वडने ता.जि.धुळे येथील नविन अविभाज्य सत्ता प्रकाराची/भोगवटा वर्ग २ ची शेतजमीन गट क्र.१२६ यासी क्षेत्र १० हे ८२ आर पो.ख. १ हे १० आर एकूण क्षेत्र ११ हे ९२ आर त्यासी आकार १७ रु. ७५ पैसे

ब) मौजे वडने ता.जि.धुळे येथील नविन अविभाज्य सत्ता प्रकाराची/भोगवटा वर्ग २ ची शेतजमीन गट क्र.११८ यासी क्षेत्र ५ हे ७८ आर पो.ख. ० हे ९३ आर एकूण क्षेत्र ६ हे ७१ आर त्यासी आकार ७ रु. १० पैसे

सदर जाहीर नोटीस आमचे अशिलांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरुन व दाखविलेल्या कागदपत्रा वरुन आमचे मार्फत प्रसिध्दीस दिली असे. धुळे, दिनांक- २६/०८/२०२६.

**ॲड.राहुलकुमार सुभाष मैंद**
ऑफिस- नं.४, हिरे भवन, जिल्हा न्यायालयासमोर, धुळे-४२४००१.
**मो.नं.९४२२२५९०७५**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस, सर्व हितसंबंधीतांना तसेच सर्व वित्तीय संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था यांना या जाहीर नोटीसी द्वारे कळविण्यात येते की, खालील परीशिष्ठात नमूद केलेल्या मिळकती संदर्भात आमचे अशिल आमचे अशिल श्री.मोहन कन्हैय्यालाल चित्ते, रा.धुळे यांनी परिशिष्टात नमूद मिळकतीचे मालक श्रीमती हर्षल राजीव अग्रवाल यांचे सोबत परिशिष्टात नमूद मिळकत विकत घेणे संदर्भात लेखी सौदा केलेला असून सौदया प्रमाणे पुर्तता करुन देण्यास आमचे अशिल तयार असतांना देखील मिळतीचे मालक हे सौदया प्रमाणे पुर्तता करुन देण्यास कुचराई करत आहेत. श्रीमती हर्षल राजीव अग्रवाल हे सदर परिशिष्टात नमूद मिळकती विकण्याच्या तसेच त्रयस्त हक्क निर्माण करण्याच्या तयारीत आहेत.

तरी सदर मिळकतीबाबत कोणीही कोणत्याही प्रकारचे खरेदी खत, मालकी हक्क, हिस्सा, हितसंबंध, गहाण, बोजा, टाच, जप्ती, भाडेपट्टा, ताबा हक्क, वहीवाट हक्क, सौदे करार या अन्वये अधिकार हक्क वै. निर्माण करू नये केल्यास सदर व्यवहार आमचे अशिल आणि सदर मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही.

**मिळकतीचे वर्णन**

अ) मौजे वडने ता.जि.धुळे येथील नविन अविभाज्य सत्ता प्रकाराची/भोगवटा वर्ग २ ची शेतजमीन गट क्र.१२८/३ यासी क्षेत्र ०१ हे ३४ आर पो.ख.० हे ०० आर एकूण क्षेत्र ०१ हे ३४ आर त्यासी आकार ०२ रु.२० पैसे

ब) मौजे वडने ता.जि.धुळे येथील नविन अविभाज्य सत्ता प्रकाराची/भोगवटा वर्ग २ ची शेतजमीन गट क्र.१२८/४ यासी क्षेत्र १ हे ३२ आर पो.ख. ० हे ३१ आर एकूण क्षेत्र १ हे ६३ आर त्यासी आकार २ रु.१५ पैसे

सदर जाहीर नोटीस आमचे अशिलांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरुन व दाखविलेल्या कागदपत्रा वरुन आमचे मार्फत प्रसिध्दीस दिली असे. धुळे, दिनांक- २६/०८/२०२६.

**ॲड.राहुलकुमार सुभाष मैंद**
ऑफिस- नं.४, हिरे भवन, जिल्हा न्यायालयासमोर, धुळे-४२४००१.
**मो.नं.९४२२२५९०७५**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना तसेच बँका, पतसंस्था, इतर वित्तीय संस्था, सरकारी निमसरकारी संस्था व सावकार यांना या जाहीर नोटीसी द्वारे कळविण्यात येते की,

आमच्या मालकीची गंगाखेड शुगर ॲण्ड एनर्जी लि., नागपुर तसेच शांती- लक्ष्मी कंस्ट्रक्शन प्रा.लि. नागपुर हया कंपन्या गंगाखेड सोलर पॉवर लि. यांच्या मालकीच्या होत्या त्या कंपनीसाठी जमीनी संदर्भात रजिस्टर दस्त नोंदवणे, खरेदी विक्री व्यवहार बघणे, न्यायालयीन कामकाज बघणे इ. इतर कामांसाठी धुळे शहर व धुळे तालुक्यातील मौजे बोरसुले, मौजे चिंचवार, मौजे बोरीस, शिरधाणे प्र.नेर इत्यादी तालुकयातील व इतर गावांसाठी कंपनीने मुख्त्यारपत्राव्दारे १) श्री.गणेश रोहीदास पाटील, २) श्री.संतोष निळकंठ कासार, ३) श्री.पंकज विजयकुमार शेवाळे व ४) श्री.प्रदीप सत्यलाल शिंदे यांची कंपनीने कंपनीचे कामकाज बघण्यासाठी प्रतिनिधी म्हणून नेमणूक केली होती व तसे त्यांना वरील संदर्भाचे अधिकार दिले होते परंतू वरील निवडलेले प्रतिनिधी यांनी कपंनीच्या हिता विरुध्द जावून कामकाज केले व कंपनीचे जमीन हडपण्याचे प्रयत्न केले म्हणून वरील नमूद कंपनीने सदर व्यक्तींचे अधिकार व प्रतिनिधीतत्व कायमस्वरुपी काढून घेतले आहे व ते आता आमच्या कंपनीचे कर्मचारी नाहीत. त्यामुळे आमच्या कंपनीच्या वतीने या वरील लोकांशी कोणीही कुठलाही स्वरुपाचा व्यवहार, मिळकत हस्तारंणचे व्यवहार आर्थिक, सौदा, करार, बक्षीस, गहाण, लिज, लिव्ह ॲण्ड लायसन्स, भाडेपट्टा, मुखत्यार अथवा कोणत्याही स्वरुपाचे हस्तांतरणाचे किंवा कोणत्याही संदर्भात व्यवहार करु नये याही उपर असे व्यवहार केल्यास ते व्यवहार कंपनीवर व कंपनीच्या मालकीच्या कोणत्याही मिळकतीवरती बंधनकारक राहणार नाही यांची नोंद घ्यावी. तसेच अश्या वेळी व्यवहार करणारे व करुन देणार यांचे विरुध्द कंपनी व कंपनीचे प्रतिनीधी कायदेशिर कारवाई करतील व त्यावेळी होणाऱ्या खर्च व परिणामास संबंधीत व्यक्ती जबाबदार राहतील याची देखील नोंद घ्यावी.

सदरची मिळकत ही दिलेल्या माहितीनुसार प्रसिध्दीस देण्यात आली असुन सदर जाहिर नोटीसीतील मजकूर माझ्या माहितीप्रमाणे व समजूतीप्रमाणे खरी व बरोबर आहे. धुळे, दिनांक- २७/०८/२०२६.

ॲड.विशाल सुहास चौधरी
अधिकृत प्रतिनिधी गंगाखेड सोलर पॉवर लि., गंगाखेड.

**ॲड.उज्ज्वल बी.चौधरी**
१०९, चेंबस जिल्हा व सत्र न्यायालय कोर्ट, धुळे.
**मो.नं.८८०५५२१६४८**

## टायटल व्हेरिफिकेशनसाठी नोटीस

तमाम जनतेस, सर्व हितसंबंधीतांना तसेच सर्व वित्तीय संस्था व स्थानीक स्वराज्य संस्था यांना या जाहीर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात नमूद केलेली मिळकत ही १.सौ.मनोरमा मोहन अग्रवाल २.श्री.सुनिल रमेश अग्रवाल आणि ३.श्री.नितीन नारायण अग्रवाल तिघे रा.धुळे यांची खालील परिशिष्टात नमूद मालकीची मिळकत त्यांनी कायम स्वरूपी विक्रीचा सौदे करार आमचे अशिलांशी केलेला असून सदर व्यवहार लवकरच पूर्ण होणार आहे. सबब सदर मिळकतीच्या टायटल व्हेरीफिकेशन हेतू सदर नोटीस प्रसिध्द करीत आहे.

तरी सदर मिळकतीत कोणाचेही कोणतेही प्रकारचे मालकी हक्क, हिस्सा, हितसंबंध, गहाण, बोजा, टांच, जप्ती, भाडेपट्टा वा लिज हक्क, ताबा हक्क वा सौदेकरार हक्क अगर खरेदी हक्क वैगेरे काहीही असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांचे आंत त्याबददल स्वताच्या हक्काच्या प्रमाणीत झेरॉक्स प्रतिसह आम्हास वरील नमूद पत्त्यावर लेखी कळवावे, परस्पर वर्तमानपत्रात घेतलेल्या हरकतीचा तसेच दस्तऐवजांशिवाय घेतलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही.

नियोजीत मुदतीत कोणाचीही साधार व लेखी तक्रार न आल्यास सदर मिळकत निर्वेध व निर्बोज असून तथाकथीत हक्क व अधीकार संबंधीतांनी सोडून दिलेले आहे असे समजण्यात येईल. या नंतर कोणीही काहीही तक्रार, हितसंबंध अगर हक्क दाखविल्यास या मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी. कळावे.

**परिशिष्ट**

मौजे धुळे, ता.जि.धुळे येथील महानगरपालिका हद्दीतील धुळे जिल्हा न्यायालयाजवळील, स्टेशन रोड परीसरातील सि.स.नं.३५१६/अ पैकी प्लॉट क्रंमाक २४ चे एकूण क्षेत्र ५०७.५० चौ.मी ची मिळकत आणि यामध्ये सुमारे ५५ वर्षे जुने लोडबेअरीगंचे बांधकामाचे एकूण क्षेत्रफळ २१८.७५ चौ.मी. अशी बखळ व बांधकामासहीत असलेली संपूर्ण मिळकत, यासी चर्तु:सिमा येणेप्रमाणे असे.

| | |
|---|---|
| पुर्व- स्टेशन रोड, | पश्चिम- सि.स.नं.३५१६/अ/१७, |
| दक्षिण- वापर व रस्ता, | उत्तरेस- सि.स.नं.३५१६/अ/२५ |

सदर नोटीस टायटल व्हेरीफिकेशनसाठी आमचे मार्फत प्रसिध्दीस दिली असे. दि.२७/०८/२०२६.

**ॲड.राजेश नंदलाल अग्रवाल**
ऑफिस- ५, दिघे ॲडव्होकेट चेंबर्स, धुळे जिल्हा न्यायालय समोर, स्टेशन रोड, धुळे. **मो.नं.९८५००९२७५३**

## जाहीर नोटीस

आमचे अशिल श्री.सुरेश कृष्णदास मांडे, रा.१४४, स्नेहप्रभा हौसींग सोसायटी, वृंदावन कॉलनी जवळ, देवपूर धुळे, ता.जि.धुळे यांनी दिलेल्या माहिती वरुन व अधिकारावरुन तमाम लोकांना तसेच बँका, पतसंस्था, इतर वित्तीय संस्था, सरकारी निमसरकारी संस्था व सावकार यांना या जाहीर नोटीसी द्वारे कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन** :- मौजे देवपूर, ता.जि.धुळे सर्व्हे नं.६५/२+३+५+६/अ पैकी प्लॉट नं.२७, क्षेत्र १७६ चौ.मी आकार रु.१३ रु. यास विस्तारित क्षेत्र मोजणीत सि.स.नं.२४५९ यासी चतु:सिमा व मापे खालीपप्रमाणे

| | |
|---|---|
| पुर्वेस- १६ मी रस्ता, | दक्षिणेस- प्लॉट नं.२६, |
| पश्चिमेस- प्लॉट नं.२४, | उत्तरेस- प्लॉट नं.२८. |

ही मिळकत आशाबाई कृष्णदास मांडे यांनी द.क्र.३०१० दि.१५/०७/२००५ रोजी सौ.शारदा संजय पाटील यांचे ज.मु. फरीद बेग अय्यासबेग मिर्झा यांचेकडून कामयस्वरुपी रजिस्टर खरेदीने विकत घेतलेली आहे व तेव्हापासून सदर मिळकत आमच्या अशिलांच्या मालकी व ताबे उपभोगात आहे.

सदरची बाब हि श्री.हिरामण बाबुराव माळी, वत्सलाबाई भटु माळी, कमलाबाई रघुनाथ माळी, कोकीळाबाई साहेबराव माळी, इंदुबाई तुकाराम माळी, भरत तुकाराम माळी, वंदना प्रमोद माळी, शत्रुघ्न तुकाराम माळी, संगिता रविंद्र माळी, मथुरा पंडित माळी, ललिताबाई उर्फ ललिताबेन अर्जुन माळी, लताबाई अविनाश महाजन यांना माहित असतांना देखील त्यांनी सदरच्या मिळकती वर बेकायदेशीर पध्दतीने त्यांच्या नावे लावून घेतली आहेत व त्याचा गैरफायदा घेत ते सदर मिळकत हस्तांतरीत करण्याची शक्यता आहे. तसेच सदर मिळकतीत त्रयस्थ हक्क निर्माण करण्याची शक्यता आहे.

तरी वरील नमूद व्यक्तींशी कोणीही कुठलाही आर्थिक व्यवहार, सौदा, इतर करार, खरेदी विक्री, अदलाबदल, गहाण, लिज, लिव्ह ॲण्ड लायसन्स, भाडेपट्टा, मुखत्यारपत्र अथवा कोणत्याही स्वरुपाचे हस्तांतरणाचे किंवा कोणत्याही प्रकारचे व्यवहार करु नये केल्यास ते व्यवहार वर नमूद मिळकतीवरती आमच्या अशीलांवरती बंधनकारक राहणार नाही यांची नोंद घ्यावी. तसेच अश्या प्रसंगी व्यवहार करणारे व करुन देणारे यांचे विरुध्द आमचे अशिल कायदेशिर कारवाई करतील व त्यावेळी होणाऱ्या खर्च व परिणामास संबंधीत व्यक्तीच जबाबदार राहतील याची देखील नोंद घ्यावी.

सदरची मिळकत ही दिलेल्या माहितीनुसार प्रसिध्दीस देण्यात आली असून सदर जाहिर नोटीसीतील मजकूर माझ्या माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे खरी व बरोबर आहे.

धुळे, दिनांक- २८/०८/२०२६.

**ॲड.आयुष ओमप्रकाश खंडेलवाल**
प्लॉट नं.७, लॉ कॉलेज रोड, भिडेबाग, देवपूर, धुळे-४२४००२.
**मो.नं.७३५०६१५४४४**

## टायटल व्हेरिफिकेशन जाहीर नोटीस

तमाम जनतेस बँकाना हितसंबधितांना सदर टायटल व्हेरिफिकेशन जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की,

(०१) **मिळेतीचे वर्णन** :- मौजे धुळे-२, ता.जि.धुळे येथील धुळे महानगरपालीका हद्दीतील सिटी सर्व्हे नंबर २६५२/अ, शिट नंबर १२, चे एकूण क्षेत्र. १८.४० चौ.मी. सत्ताप्रकार अ बांधीव मिळकत यासी चतु:सिमा

| | |
|---|---|
| पुर्वेस :-सि.स.नं.२६५२/ब, | पश्चिमेस :- रस्ता, |
| दक्षिणेस : सि.स.नं.२६५७/१, | उत्तरेस :- सि.स.नं.२६५१/१. |

येणे प्रमाणे चतु:सिमेतील बांधीव मिळकत ही बाळकृष्ण राजाराम तलवारे, रमेश राजाराम तलवारे, सुरेश राजाराम तलवारे, सुधीर राजाराम तलवारे, शशिकला प्रकाश वाणी, मंगल देवीदास कोतकर, सर्व रा:- जिनगर गल्ली, किसनबत्ती खुंट, धुळे यांचे नावे महसुल दप्तरी फेरफार नोंद क्रं.२२०२ दिनांक ३१/०७/२०१४ अन्वये त्यांचे नावे प्रमाणित होती व आहे.

(०२) **मिळेतीचे वर्णन** :- मौजे धुळे-२, ता.जि.धुळे येथील धुळे महानगरपालीका हद्दीतील सिटी सर्व्हे नंबर २६५२/ब, शिट नंबर १२, चे एकूण क्षेत्र. ७२.७० चौ.मी. सत्ताप्रकार अ बांधीव मिळकत यासी चतु:सिमा

| | |
|---|---|
| पुर्वेस :-रस्ता, | पश्चिमेस :- सि.स.नं.२६५२/अ, |
| दक्षिणेस :- सि.स.नं.२६५३, | उत्तरेस :- सि.स.नं.२६५१/२ब. |

येणे प्रमाणे चतु:सिमेतील बांधीव मिळकत ही रमेशकांत राजाराम, रा:- जिनगर गल्ली, किसनबत्ती खुंट, धुळे यांचे नावे महसुल दप्तरी फेरफार नोंद क्रं.१४५७ दिनांक १९/०८/२०२६ अन्वये त्यांचे नावे प्रमाणित होती. व आहे.

अशी त्यांची कब्जे उपभोगातील वहीवाटीतील मिळकतीची त्यांनी आमचे आशिल यांचे बयाणा रक्कमेचा स्विकार करणार असून आमचे आशिल यांचे लाभात सौदापावती करुन देणार आहेत. त्यांचे सांगणेवरुन आमचे मार्फत जाहीर नोटीस प्रसिध्द करण्यात येत आहे.

सदर मिळकतीवर इतर कोणाचाही कुठल्याही प्रकारे हितसंबंध देणे घेणे, मालकी हक्क, भाडेपट्टा वा लिज, ताबा, गहाण, बोजा, टाच वा वारस, खावटी असल्यास सदर नोटीस जाहीर झाल्यांचे ०७ दिवसांचे आत योग्य त्या कागदपत्रांच्या प्रति सहीत आमचे ऑफिसांत हरकती सादर कराव्यात. परस्पर जाहिर नोटीस वर्तमान पत्रांत आल्यांस त्या ग्राहय धरण्यांत येणार नाही व हरकती न आल्यास आमचे पक्षकार हे सदर मिळकतीचे बोनाफाईड पर्चेसर आहेत असे समजले जाईल व सदर मिळकत ही निर्वेध व निर्बोज म्हणून खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत आमचे आशिलांवर बंधनकारक असणार नाही. सदर पेपर नोटीस ही आमचे मार्फत आमचे आशिलांनी दाखविलेल्या कागदपत्रावरुन व त्यांनी तोंडी कथन केलेल्या माहितीवरुन व दिलेल्या अधिकारावरुन देण्यात आलेली आहे. येणे प्रमाणे जाहीर नोटीस होय. धुळे, दिनांक- २७/०८/२०२६.

**ॲड.योगेश सुभाष शिंदे**
एफ-४४, पहिला मजला, स्किम ए.गरूड मैदान संकुल,
कमलाबाई शाळे समोर, साक्री रोड, धुळे-४२४००१.
**मो.नं.९४०३७६२८३४/८०८७७९८७९५**

पान १ वरुन

## १६८ जणांना जलसमाधी

जाणवण्याची शक्यता आहे. विशेषतः बिहारमधील गंडक नदी आणि तिच्याशी संबंधित नद्यांच्या पाणीपातळीत वाढ होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. नेपाळमधून सुमारे तीन मीटर उंचीची पुराची लाट येण्याचा इशारा देण्यात आला आहे. पश्चिम चंपारण, पूर्व चंपारण, गोपालगंज, सारण, मुझफ्फरपूर आणि वैशाली या जिल्ह्यांमध्ये प्रशासनाकडून विशेष दक्षता घेतली जात आहे. सीतामढी आणि शिवहर जिल्ह्यांवरही लक्ष ठेवण्यात आले आहे. नेपाळमधील पाणी त्रिशुली नदीमार्गे गंडक नदीत पोहोचण्याची शक्यता असल्याने उत्तर बिहारमध्ये पाणीपातळी वाढू शकते. उत्तर प्रदेशातील महाराजगंज आणि कुशीनगर जिल्ह्यांनाही सतर्क राहण्याचा इशारा देण्यात आला आहे.

**केदारनाथ दुर्घटनेची आठवण**

नेपाळमधील या दुर्घटनेची तुलना २०१३ मधील केदारनाथ आपत्तीशी केली जात आहे. चोराबाडी सरोवरातील पाणी आणि त्यानंतर आलेल्या प्रचंड पुरामुळे केदारनाथ, गौरीकुंड आणि सोनप्रयाग परिसरात २०१३ मध्ये मोठा विध्वंस झाला होता. सध्याच्या नेपाळमधील घटनेतही हिमनदी, भूस्खलन आणि पुराच्या पाण्यामुळे मोठ्या प्रमाणावर ढिगारा वाहून गेला आहे. त्यामुळे दुर्गम भागातील नागरिकांचा शोध घेणे बचाव पथकांसाठी मोठे आव्हान ठरत आहे.

**दीडशे कि.मी. दूर सापडले मृतदेह**

पुराचा प्रवाह आणि ढिगाऱ्याची तीव्रता किती प्रचंड होती, याचा अंदाज यावरून येतो की दुर्घटनास्थळापासून तब्बल दीडशे किलोमीटर अंतरावर ३३ मृतदेह आढळले आहेत. त्यामुळे बेपत्ता नागरिकांचा शोध घेण्यासाठी बचाव पथकांकडून नदीपात्र आणि आसपासच्या विस्तीर्ण भागात शोधमोहीम राबवली जात आहे.

## उशीर केल्यास सिलेंडर महाग

अनुदानित दरात सिलेंडर मिळण्यात अडचणी येऊ शकतात. ई-केवायसी पूर्ण होईपर्यंत व्यावसायिक दराने सिलेंडर घ्यावा लागू शकतो. त्यामुळे घरगुती ग्राहकांच्या खिशावर अतिरिक्त आर्थिक भार पडण्याची शक्यता आहे. मात्र, ई-केवायसी न केल्याने तत्काळ गॅस कनेक्शन रद्द केले जाणार नसल्याचे सांगण्यात आले आहे. दीर्घकाळ पडताळणी प्रलंबित राहिल्यास कनेक्शनवर निर्बंध येण्याची शक्यता आहे. ई-केवायसीची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी मोठ्या संख्येने ग्राहक प्रयत्न करत असल्याने डिजिटल यंत्रणेवर ताण येत आहे. अनेक ठिकाणी सर्व्हर डाऊन, तांत्रिक अडचणी आणि संथ प्रक्रिया यामुळे ग्राहकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. गॅस एजन्सींमध्येही ई-केवायसीसाठी मोठी गर्दी होत आहे. काही वेळा ग्राहक तासनतास रांगेत उभे राहिल्यानंतर सर्व्हर बंद असल्यामुळे त्यांची पडताळणी पूर्ण होत नाही.ई-केवायसीसाठी ग्राहकांना गॅस एजन्सीत जाण्याचा पर्याय उपलब्ध आहे. एजन्सीमध्ये बायोमेट्रिक प्रमाणीकरणाद्वारे पडताळणी करता येते. तसेच काही परिस्थितीत सिलेंडरची डिलिव्हरी करणाऱ्या कर्मचाऱ्यांकडील अधिकृत उपकरणाद्वारेही बायोमेट्रिक ई-केवायसी पूर्ण करता येऊ शकते. त्यामुळे अंतिम मुदतीची वाट न पाहता ग्राहकांनी शक्य तितक्या लवकर आपली ई-केवायसी पूर्ण करून घेणे योग्य ठरणार आहे.

## गुटख्याचा कंटेनर पकडला

सुवर्णा देविदास महाजन आणि महावितरणचे सहाय्यक अभियंता पंच साक्षीदार तुषार नारायण गोरे यांच्या पथकाने सोनगीर पोलीस ठाण्यात उभ्या असलेल्या संशयित कंटेनरची (क्रमांक -१४--८७८२) कसून तपासणी केली. कंटेनरचालकाची चौकशी केली असता त्याने आपले नाव मुनफेद कल्लु खान (वय ३० वर्ष, रा. हडबर, ता. जि. नूह, हरियाणा) असे सांगितले. मालकी हक्क व खरेदी बिलाबाबत विचारणा केली असता चालकाने उडवाउडवीची उत्तरे दिल्याने पथकाला संशय आला. कंटेनरची पाहणी केली असता त्यात महाराष्ट्रात बंदी असलेला गुटखा, पानमसाला व सुगंधी तंबाखूचा साठा आढळून आला. या कारवाईत इंडियाज फायनेस्ट ब्लेंड क्लासिक चे ५ किलोचे ३२ पाकिटे (४ बॉक्स) कि. रु. ८०,०००, हीरा केसर चे ५०० ग्रॅमचे ७२० पाकिटे (९ बॉक्स) कि. रु. २,१६,०००, रत्ना ब्रँड तंबाखू क्र. ३०० चे ५०० ग्रॅमचे ४८ डब्बे कि. रु. २५,४४० आणि १५,००,००० रुपयांचा एक कंटेनर (क्र.आरजे१४/जीयु-८७८२) असा एकूण १८,२१,४४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. महाराष्ट्र शासनाच्या अन्न सुरक्षा आयुक्तांच्या निर्देशानुसार राज्यात गुटखा व तत्सम पदार्थांच्या उत्पादन, साठा, वाहतूक व विक्रीवर पूर्ण बंदी आहे. या कायद्याचे उल्लंघन केल्याप्रकरणी अन्न सुरक्षा अधिकारी सुवर्णा महाजन यांच्या फिर्यादीवरून संशयित चालक मुनफेद कल्लु खान याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच या गुटखा आणि तंबाखूच्या मूळ उत्पादकांपर्यंत पोहोचण्यासाठी पोलिसांनी भारतीय न्याय संहिता विविध कलमाने जुना दाखल केला असून सोनगीर पोलीस मुख्य सूत्रधार आणि उत्पादक कंपनीचा शोध घेण्यासाठी अधिक तपास करत आहेत.

## ॲड.पंकज गोरेंचे आंदोलन

गुटखा यांसह इतर कथित अवैध धंदे तात्काळ बंद करावेत आणि संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी प्रमुख मागणी आंदोलनातून करण्यात येत आहे. या अवैध धंद्यांमुळे तरुण पिढी व्यसनाच्या आहारी जात असून गुन्हेगारीला चालना मिळत असल्याचा आरोप ॲड. पंकज गोरे यांनी केला आहे.शहरातील टपरी व रोडगाडीधारकांवर होत असलेल्या कारवाईलाही आंदोलनकर्त्यांनी विरोध केला आहे. वाहतुकीला अडथळा निर्माण होत असल्यास नियमानुसार कारवाई करण्यास विरोध नाही; मात्र सरसकट कारवाई करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या कष्टकरी व्यावसायिकांना बेरोजगार करू नये, प्रशासनाने जप्त केलेले टपरीधारक व रोडगाडीधारकांचे साहित्य कोणताही दंड न आकारता तातडीने परत करावे, जिल्ह्यातील कथित अवैध धंद्यांविरोधात वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथक स्थापन करून व्यापक मोहीम राबवावी, अशी मागणी ॲड. गोरे यांनी केली आहे. सराईत गुन्हेगारांवर कठोर कायदेशीर कारवाई करावी तसेच सोशल मीडियावर गुन्हेगारीचे उदात्तीकरण करणाऱ्यांवरही कारवाई करावीआंदोलनाच्या माध्यमातून प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी निषेध आंदोलन, जनजागृती आणि पथनाट्याचे आयोजन करण्यात येत आहे. प्रशासनाने मागण्यांची दखल घेऊन अवैध धंद्यांविरोधात ठोस कारवाई केली नाही, तर आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल आणि आमरण उपोषण सुरू करण्याचा इशारा ॲड. पंकज गोरे यांनी दिला आहे.आंदोलन करतांना माजी आ. अनिल गोटे, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष जिल्हाप्रमुख शाना सोनवणे, मोहन तनवाणी, तेजस गोटे, महिला आघाडी तारका विवरेकर,प्रशांत भदाणे,उपमहानगरप्रमुख पंकज भारस्कर, सुरज भावसार, सोमनाथ चौधरी, मनोज गवळी, संजय लहामगे, गजेंद्र पाटील, बंटी गोरे, स्वप्नील सोनवणे, सोनू मुर्तडकर, विपुल भारस्कर, अनिल शिरसाठ, गोकुळ येलमामे, दर्शन खंबायत, पवन सरग, सौरभ जवराळ, पंकज बागुल, मुकेश जाधव, इस्तियार अन्सारी, हिमांशू परदेशी व धुळेकर कर बंधू-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वन्यजीव संरक्षणासह गुन्हेगारीबाबत..

मानवी वस्तीकडे वाढलेला ओघ लक्षात घेता नागरिक व प्राण्यांच्या सुरक्षेसाठी उपाययोजना करणे, धुळे शहर व परिसरात काळवीटसह इतर वन्यप्राण्यांच्या बेकायदेशीर मांस विक्रीवर करणाऱ्यांवर कारवाई करणे. लळींग परिसरात एयर गनच्या सहाय्याने शिकार करणाऱ्या संशयितांचा शोध घेऊन कारवाई करणे. शिरपूर व परिसरात वनक्षेत्रात गांजा लागवडीस प्रतिबंधासाठी पोलीस व वन विभागाची संयुक्त कारवाई करणे, सर्पमित्रांकडुन करण्यात येणारे सर्पाचे बेकायदेशीर प्रयोग/प्रदर्शन रोखण्यासाठी स्थानिक पोलीसांची मदत घेऊन संयुक्त कारवाई करणे, गांजा लागवड किंवा अवैध वन्यजीव शिकार यासारख्या घटनांची माहिती त्वरीत मिळण्यासाठी स्थानिक पोलीस पाटील यांची मदत घेणे, रस्ता सुरक्षा उपाययोजना महामार्ग व वनक्षेत्रातील रस•त्यांवर वन्यप्राण्यांच्या सुरक्षेसाठी भुयारी मार्ग, सुचना फलक उभारण्याबाबत संबंधित कंत्राटदारांना सुचना देणे, आदी विषयांवर चर्चा झाली.

पान १ वरुन

## सात जणांचा दुर्दैवी मृत्यू

घटनेमुळे प्रचंड दुःख व्यक्त होत आहे.

**मुलाला वाचवण्याच्या प्रयत्नात वडिलांचाही तलावात बुडून मृत्यू**

दुसरी दुर्दैवी घटना तालुक्यातील खवशी येथे घडली. गावतळ्याकाठी राहणारा वीरेंद्र हा लहान मुलगा अचानक तलावाच्या पाण्यात पडला आणि गाळात अडकला. त्याला वाचवण्यासाठी वडील आण्णा एकनाथ तलवारे (वय ३३) यांनी तातडीने पाण्यात उडी घेतली. दुर्दैवाने, ते स्वतःही गाळात फसले आणि दोघांचाही पाण्यात बुडून मृत्यू झाला. गावकऱ्यांच्या मदतीने दोन्ही मृतदेह पाण्याबाहेर काढून उत्तरीय तपासणीसाठी ग्रामीण रुग्णालयात पाठवण्यात आले आहेत.

**बुधवारीही एकाची रेल्वेखाली आत्महत्या**

या दुर्दैवी सत्रादरम्यान, चोपडा तालुक्यातील नरवाडे येथील रहिवासी ज्ञानेश्वर कैलास धनगर (वय ३०) याने बुधवारी (२६ तारीख) सायंकाळी चोपडा रस्त्यावरील कचरा डेपोजवळ खान्देश एक्स्प्रेसखाली झोकून देऊन आत्महत्या केली. या प्रकरणाचा पुढील तपास हेडकॉन्स्टेबल गणेश पाटील करत आहेत.

## ॲम्बिशन क्रिकेट स्पर्धा

तसेच बक्षीस वितरण कार्यक्रम प्रसंगी संस्थेच्या सचिव सौ. रेषा पटेल, विश्वस्त अतुल भंडारी, विश्वस्त विजय भंडारी, सीईओ डॉ. उमेश शर्मा, अकॅडमिक इन्चार्ज पी.व्ही.पाटील, प्राचार्य एस. जे. पाटील, प्राचार्या स्मिता उगले, क्रीडा समन्वयक जे.पी.पाटील, पूजा जैन, कुणाल सुर्वे, सुभाष पावरा आदी उपस्थित होते. क्रिकेट प्रशिक्षक आनंद जगताप, चेतन राजपूत, भावेश शर्मा यांनी स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. विजयी विद्यार्थ्यांना क्रिकेट प्रशिक्षक, सहभागी शाळांचे क्रीडा शिक्षक, विविध खेळांचे प्रशिक्षक यांचे मार्गदर्शन लाभले. स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी क्रीडा शिक्षक एम.एस.पाटील, जयवंत ठाकूर, डी.बी. पाटील, अनुप चंदेल, राहुल स्वर्गे, मोहसीन कुरेशी ,मयुरी भामरे तसेच सर्व क्रीडा प्रशिक्षक यांचे सहकार्य लाभले. सर्व विजयी संघांच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, नगराध्यक्ष चिंतनभाई पटेल, संस्था उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, सचिव सौ. रेषा पटेल, विश्वस्त अतुल भंडारी, विश्वस्त विजय भंडारी, सर्व प्राचार्य, शिक्षकवृंद, क्रीडा विभाग व प्रशिक्षकांनी सर्व विजेत्या खेळाडूंचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## मच्छिमार शिखर संघावर ठाकूरांची निवड

**धुळे, दि.२७- येथील सातपुडा धुळे जिल्हा मच्छिमार सहकारी संस्थांच्या सहकारी संघ मर्या. धुळे यांचे सचिव सुरतसिंग हिंमतसिंग ठाकूर यांची नुकतीच महाराष्ट्र राज्य मच्छिमार सहकारी संघ मुंबई राज्य शिखर संघाचे संचालक म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे.**

राज्य शिखर संघाचे व्हा. चेअरमन रवींद्र पाटील यांनी संघाच्या अध्यक्षत्त ज्योती राजेश मेहेर यांच्या सहीचे नियुक्तीपत्र सुरतसिंग ठाकूर यांना दिले. ठाकूर यांची राज्य शिखर संघावर नियुक्ती झाल्याने संघाच्या अध्यक्षा ज्योती मेहेर, उपाध्यक्ष रवींद्र पाटील, अशोक राजपूत, हिरालाल मोरे, पत्रकार तव्वाब अन्सारी, सामाजिक कार्यकर्ता गोपाल माने, निलेश ढालवाले, संजय फुलपगारे यांनी शुभेच्छा दिल्या.

पान १ वरुन

## विकासाला खरी गती मिळणार

तालुक्यापासून जिल्ह्यापर्यंत आणि पुढे राज्य व देशाच्या विकासासाठी आपण सर्वजण सातत्याने काम करीत आहोत. त्याच प्रयतकांचा एक भाग म्हणून निरगुडी गावात विविध विकासकामे हाती घेण्यात येत आहेत. आजच्या शुभप्रसंगी सार्वजनिक वाचनालयासह विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण कामाचे भूमिपूजन होत असल्याचा आनंद आहे.

निरगुडी गावाने गेल्या अनेक दशकांपासून सामाजिक एकोपा आणि एकजूट जपली आहे. गावातील ज्येष्ठ नेतृत्वाने गेल्या ४० ते ५० वर्षांपासून सर्व समाजघटकांना एकत्र ठेवण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. त्यामुळे गावाची सामाजिक प्रतिष्ठा कायम राहिली असून सार्वजनिक आणि राजकीय क्षेत्रातही निरगुडीचे महत्त्व टिकून राहिले आहे. गावाच्या विकासामागे ही एकजूट हीच सर्वांत मोठी ताकद असल्याचे पालकमंत्री श्री. रावल यांनी सांगितले.ते म्हणाले, प्रत्येक विधानसभा निवडणुकीत निरगुडी गावाने एकत्रितपणे विकासाची भूमिका घेतली आहे. निवडणुकीच्या प्रचारासाठी गावात काही मिनिटांचा वेळ मिळत असला, तरी त्यानंतरची पाच वर्षे गावाच्या विकासाची कामे मार्गी लावण्यासाठी असतात. गावातील सर्व जाती-धर्मांचे नागरिक आपापसातील मतभेद बाजूला ठेवून गावाच्या हितासाठी एकत्र येतात. लोकप्रतिनिधींच्या पाठीशी विकासाच्या भूमिकेतून उभे राहतात. त्यामुळेच गावातील विकासकामांना सातत्याने गती देता आली आहे.

निरगुडी गावाने विकासाची मागणी केल्यानंतर ती पूर्ण करण्यासाठी सकारात्मक भूमिका घेण्यात आली आहे. गावाच्या विकासासाठी करावयाच्या कामांची मोठी यादी असून ती कामे टप्प्याटप्प्याने मार्गी लावण्याचा प्रयतक केला जाईल, असे सांगून पालकमंत्री श्री. रावल म्हणाले, रस्ते, नाले, संरक्षण भिंती, पाणीपुरवठा यांसारख्या मूलभूत सुविधांची कामे नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी थेट निगडित आहेत. त्यामुळे अशा कामांना प्राधान्य देणे आवश्यक आहे.

शिंदखेड्याकडे जाणाऱ्या रस्त्यालगतच्या नाल्याचा प्रश्न तसेच नाल्याला संरक्षण भिंत बांधण्याचे काम महत्त्वाचे आहे. त्याचप्रमाणे ८५ गावांच्या पाणीपुरवठ्याशी संबंधित विषयही नागरिकांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. पिण्याचे पाणी, रस्ते आणि इतर मूलभूत सुविधा निर्माण झाल्यानंतर त्याचा लाभ केवळ आजच्या नागरिकांनाच नव्हे, तर भावी पिढ्यांनाही होतो. त्यामुळे दीर्घकालीन विकासाचा विचार करून ही कामे पुढे नेण्यात येतील, असे त्यांनी सांगितले.गावाच्या भौतिक विकासाबरोबरच शैक्षणिक आणि वैचारिक विकासही तितकाच महत्त्वाचा आहे. सार्वजनिक वाचनालयामुळे गावातील विद्यार्थी, युवक आणि नागरिकांना ज्ञानाची नवी दारे खुली होतील. वाचन संस्कृती वृद्धिंगत होऊन स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या ग्रामीण विद्यार्थ्यांनाही त्याचा उपयोग होईल. त्यामुळे सार्वजनिक वाचनालय ही केवळ एक इमारत न राहता गावाच्या ज्ञानवृद्धीचे आणि भावी पिढीच्या जडणघडणीचे केंद्र ठरावे, अशी अपेक्षा पालकमंत्री श्री. रावल यांनी व्यक्त केली.

पान १ वरुन

## लव्ह अँड हेट स्टोरीतून उघड झाल्याचे स्पष्ट

फुटल्याची तक्रार केली होती. त्यानंतर त्याने तक्रार मागे घेतल्याचेही सांगण्यात आले होते. मात्र, आता याच प्रकरणात त्यालाही अटक झाल्याने तपासाला वेगळे वळण मिळाले आहे.

नंदुरबारच्या तिन्ही संशयितांची गेल्या काही काळापासून चौकशी सुरू असल्याची माहिती असून, २६ ऑगस्ट रोजी त्यांना मुंबई गुन्हे शाखेने चौकशीसाठी बोलावले. चौकशीनंतर त्यांना अटक करण्यात आल्याचे समजते. एमपीएससीच्या परीक्षेतील प्रश्नसंच बाहेर कसा गेला, त्यामागे नेमकी कोणाची भूमिका होती, प्रश्न कोणाला आणि किती मोबदल्यात उपलब्ध करून देण्यात आले, तसेच या प्रकरणात आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचा तपास गुन्हे शाखेकडून सुरू आहे.ऋतुजा पाटील आणि गौरव पाटील हे दोघे मित्र होते. यांचे ब्रेक अप झाल्याने बदलेच्या भावनेतून प्रियकराने पेपर फुटी चं बिंग फोडले. नंतर तो फितूर झाला. नंदोबाच्या ज्ञानदीप सोसायटीमध्ये अमृत पाटील हे राहतात. त्यांना आदर्श शिक्षक पुरस्कार मिळालेला आहे. या प्रकरणाने मात्र वेगळं घेतल्याने प्रवीण पाटील, अमृत पाटील व ऋतुजा पाटील यांना पोलिसांच्या समोर जावे लागले. दुसऱ्यांचे करिअर बनवणारा प्रवीण पाटील स्वतः करिअर उद्धवस्त होण्याच्या मार्गांवर आहे.

## गणेशोत्सवाच्या परवानग्या

जागेचा संपूर्ण पत्ता, प्रभाग क्रमांक आणि संबंधित पोलीस स्टेशनची माहिती भरणे बंधनकारक आहे.

अर्ज करण्यापूर्वी अर्जदाराचे आधार कार्ड, मंडळाचे नोंदणी प्रमाणपत्र, हमीपत्र, खाजगी जागा असल्यास जागा मालकाचे ना हरकत प्रमाणपत्र, मंडपाची जागा दर्शविणारा हातनकाशा आणि अर्जदाराची स्कॅन केलेली स्वाक्षरी स्वरूपात तयार ठेवावी. तसेच अर्जदाराचा फोटो आणि मंडपाच्या जागेचा फोटो अपलोड करणे बंधनकारक आहे. गणेश मंडळांना पोलीस स्टेशन तसेच वाहतूक शाखेच्या स्वतंत्र परवानगी अथवा ना हरकत दाखल्यांसाठी वेगवेगळ्या कार्यालयांमध्ये जाण्याची आवश्यकता राहणार नाही. संबंधित दाखले ऑनलाईन प्रणालीद्वारेच प्राप्त करून घेण्यात येणार आहेत. यामुळे गणेश मंडळांचा वेळ आणि श्रम वाचणार असून परवानगी प्रक्रिया अधिक सुलभ होणार आहे. ऑनलाईन परवान्यांसाठी संबंधित भागाच्या सहाय्यक आयुक्तांना प्राधिकृत करण्यात आले असून, अर्जाची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर परवानगीची प्रत अर्जदाराला ऑनलाईन उपलब्ध करून देण्यात येणार आहे.गणेशोत्सव आनंद, उत्साह आणि शिस्तबद्ध पद्धतीने साजरा व्हावा तसेच मंडळांना परवानगी प्रक्रियेत कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी महानगरपालिकेने ही डिजिटल सुविधा उपलब्ध करून दिली आहे. सर्व गणेश मंडळांनी या ऑनलाईन सुविधेचा लाभ घेऊन वेळेत अर्ज सादर करावेत, असे आवाहन आयुक्त नितीन कापडणीस यांनी केले आहे.


|| धनदाई माता प्रसन्न || || श्री गणेशाय नमः || || जय जय रघुवीर समर्थ ||

कार्य सिद्धी नेण्यास श्री सद्गुरू समर्थ आहेतच



कै.भगवान सुंदर चौधरी



कै.श्रीमती लक्ष्मीबाई भगवानशेठ चौधरी

माजी आमदार स्व.डॉ.रा.भ.चौधरी नगर

सस्नेह निमंत्रण


नामकरण सोहळा

नामकरण सोहळ्याचे अध्यक्ष

श्री.बाबासाहेब राजवर्धन कदमबांडे,माजी आमदार,धुळे शहर

प्रमुख पाहुणे: श्री.अमोल पाटणकर, उपसचिव मुख्यमंत्री कार्यालय,मंत्रालय,मुंबई

नामकरण हस्ते: श्री.मदनलालजी मिश्रा सर, अध्यक्ष लोकतंत्र सेनानी संघ धुळे



माजी आमदार स्व.डॉ.रा.भ.चौधरी

माजी आमदार स्व.डॉ.रा.भ. चौधरी नगरातील नियोजित विविध प्रकल्प

प्लॉट बुकिंग हफ्त्याने सुरु आहे

चौधरी वेअर हाऊस प्लॉटस | रघुवीर समर्थ कोल्ड स्टोरेज हाऊस | अलकनंदा लॉन्स

नामकरण हस्ते: मा.श्री. विनोदशेठ मित्तल, सुप्रसिद्ध उद्योगपती, धुळे

नामकरण हस्ते: मा.श्री. ओमप्रकाशजी अग्रवाल, ज्येष्ठ राजकीय व सामाजिक नेते, धुळे

नामकरण हस्ते: मा.श्री. सुभाषजी चोथमल अक्षवाल, सुप्रसिद्ध उद्योजक, धुळे

आलेल्या सर्व मान्यवरांचे हार्दिक स्वागत !

मातोश्री लक्ष्मी मंगल कार्यालय — नामकरण हस्ते : श्री. जगन्नाथ सुपडू चौधरी, शिरपूर तेली समाजाचे माजी अध्यक्ष

मातोश्री सरस्वती मंगल कार्यालय — नामकरण हस्ते मा.श्री. प्रकाश घवघवे (नागपूर), गिनीजबुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये नोंद असलेले ज्येष्ठ संशोधक

विनीत : श्री.रघुनाथ भगवान चौधरी * सौ.अलका रघुनाथ चौधरी * श्री.डॉ.नरेंद्र वामनराव राऊत (पुणे) * सौ. डॉ.संगिता नरेंद्र राऊत * श्री.मनोज रघुनाथ चौधरी * सौ.राजश्री मनोज चौधरी * श्री.मुकेश रघुनाथ चौधरी * सौ.पुनम मुकेश चौधरी * श्री. शुभम सतिषराव सव्वालाखे (अमरावती) * सौ.रश्मी शुभम सव्वालाखे * चि. आर्यन * साक्षी * क्षितिज * सिद्धी * समर्थ * त्रिनय

रविवार दि ३० ऑगस्ट २०२६ वेळ : सकाळी १० वा. भोजन दुपारी १२.३०ते ३.३० पर्यंत

नामकरण सोहळ्याचे स्थळ : माजी आमदार स्व.डॉ.रा.भ.चौधरी नगर ,पारोळा रोड, हॉटेल शितल च्या मागे, धुळे.



**पाहिजेत**

पेट्रोल पंपावर कामासाठी मुले पाहिजे

-: समक्ष भेटा :-

सुपर सर्वोसेंटर इंडियन ऑईल पंप

पांझरा पोळ समोर, पारोळा रोड, धुळे

**पाहिजेत**

१) अनुभवी सेल्समन पाहिजे पगार अनुभवाप्रमाणे देण्यात येईल.

२) लेडिज टॅली अकाऊन्टंट पाहिजे.

-: संपर्क :-

साईबाबा रेडिमेड & होजीअरी

अकबर चौक, गल्ली नं.२, धुळे

9422286958

**पाहिजेत**

१)बेकरीफॅक्टरीमध्येमेंटेनन्स आणि सुपरव्हिजनसाठी ITI Technician ची गरज आहे.

२) बेकरीच्या मालाच्या वाटपसाठी Salesman माणूस पाहिजे. लिहिता, वाचता आणि हिसोब करता येणे आवश्यक

-: संपर्क :-

लाइफ लाईन बेकरी

मालेगाव रोड, धुळे

7507699616

**विकणे आहे**

१) देवपूर आग्रारोड, हिम हॉटेलचेमागे, हॉस्पिटल किंवा अपार्टमेंट बनविणेसाठी उपयुक्त असा सिटीएस क्र.४९७५ क्षेत्रफळ ५४७५ चौरस फुटाचा प्लॉट.

२) गोंदुर विमानतळ रोड टच मौजे गोंदुर, गट नं.५५/३बी प्लॉट नं.१ क्षेत्रफळ ६७४० चौरस फुटाचा प्लॉट विकणे आहे.

-: संपर्क :-

9420602255/9422285483

**शेती विकणे आहे**

मौजे धुळे ता.जि. धुळे येथील स. नं. ५३१/क भोगवट वर्ग -१ क्षेत्र ० हे. २२ आर. ही मिळकत मदरसा सिराजुल उलुम धुळेची आहे. सदर शेती विकणे आहे.

-: माहितीसाठी संपर्क :-

हाजी इफतेखार अहमद मुन्ना शेठ 8625029286

बिलाल अहमद अन्सारी 9420440008

**पाहिजेत**

कापड दुकानासाठी अनुभवी सेल्समन पाहिजे. आकर्षक पगार

गिरधारी होजअरी

जेन्टस/लेडीज

बाटा शोरूम समोर

नगर पालिकाजवळ, धुळे

9420370793

9271280899

**पाहिजेत**

सोना लेडीज वेअर

किड्स वेअर

पारोळा रोड, धुळे

कपडे की दुकान के लिए

२ - सेल्समन

२ - हेल्पर

चाहिये

9767544005

**पाहिजेत**

रेडिमेड दुकान कामासाठी काम करणारी सेल्समन मुले लावणे आहे भेटा

-: संपर्क :-

श्रीसत्यनारायण ड्रेसेस

जैन मंदिराजवळ धुळे

9403744965

गरम पाण्याचा एकच उपाय...

BAJAJ Crompton Racold USHA



गॅस गिझर

आजच खरेदी करा आणि मिळवा पाईप सोबत फिटिंग फ्री *...

* मॉडेल अनुसार

59 वर्षापासून आपल्या सेवेत...

अधिकृत विक्रेते श्री महावीर इलेक्ट्रीक अँण्ड टी.व्ही.

श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे ▪ फोन: 229162, 235763


हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करून आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०